# वकिलीचे दिवस

- ❖ वकिली दुसरी पसंती
- ❖ मराठवाड्यातील वकिली व्यवसायाचे स्वरूप- शेती पिकली तरच.
  रविवारचे बाजार, अण्णा बागलाणे, ओपळकर
- ❖ काकांची वकिली - ऑफिस, पुस्तके
- ❖ फौजदारीसाठी तुंगार
- ❖ पहिल्याच दिवशी दांडेकरांच्या कोर्टात
  सोनवळ्याचा खून
- ❖ पौंडुळकर भिल्लांचे दरोडे, दादेगावचा खटला.
- ❖ आष्टीचे काम जास्त, कारणे
- ❖ भावठाण्याचा सैदू
- ❖ जाटनांदूरची केस- रानड्यांनी चेंबरमध्ये बोलावले.
- ❖ रानड्यांचे हिंदुत्व, गणेशोत्सव, खाटकाचा खून- रानड्यांचा लोभ, बड्यांची तक्रार
- ❖ वकिली दुसरी पसंती
- ❖ ओकांचा स्वभाव, मोटारकडे लक्ष, डी.ए.आर.ए.चा काकांचा मुद्दा.
- ❖ सोनारांचा खर्डा खटला, संतांचा अनुभव.
- ❖ नाशिकला सुवर्ण नियंत्रण खटला.
- ❖ नाळवंडीचे बळीराम- अर्बन बँकेस
- ❖ शहाणे सावकराचे खटले.
- ❖ माजलगावचे पक्षकार- खर्च बसल्याबद्दल तक्रार.
- ❖ खुशालराव जाधवांची बहीण व नवरा मनाने एक.
- ❖ बापलेकाचा खटला- पिंपळनेरचे मारवाडी.
- ❖ राजुरीची भक्ती - बेलुऱ्याच्या नाथा पाटील
- ❖ आष्टीच्या इमारतीचे भांडण- अहमद चाऊसचे पाकीट
- ❖ शामरावांनी दिलेली प्रकरणे.
- ❖ माधवराव तुंगारांचे अपील.
- ❖ कालिदास खून खटला.
- ❖ वैद्य आणि काका यांचे संबंध- कोर्टाचा प्रचंड विश्वास.
- ❖ टी.आर. कुलकर्णी आणि ताईसाहेब
- ❖ लेले शनिवारची डायरी.
- ❖ जगीयासी बेंच क्लार्कजवळ चौकशी- ॲडजस्ट कर देंगे
- ❖ महोदवकर- यु.आर. जोशी- मोडक- अलमेलकर

# वकिलीचे दिवस

लातूरच्या दयानंद महाविद्यालयात मराठीचा प्राध्यापक म्हणून वर्षभर केलेली नोकरी सोडण्याचा विचार मी जेव्हा केला तेव्हाही निखळ वकिली करण्याचा विचार मनात नव्हता. प्राध्यापकीची इच्छा मनात धुगधुगतच होती. औरंगाबादच्या माणिकचंद पहाडे महाविद्यालयात शिकवण्याचे काही काम मिळू शकेल असे माझ्या अर्जाच्या उत्तरी त्या संस्थेने कळवले व मी वडलांकडे बीडला माझ्या वडलांच्या हाताखाली पूर्णवेळ वकिली सुरू करण्याऐवजी औरंगाबादला अंशकालीन प्राध्यापकी आणि वकिली करण्याचे ठरवले. समाजवादी चळवळीतील औरंगाबादचे एक कार्यकर्ते आणि प्रथितयश वकील काशीनाथ नावंदर यांचा माझा पूर्वीचा परिचय होता. त्यांच्याबरोबर वकिली करण्याचा मी विचार केला. नावंदरानी आनंदाने माझे स्वागत केले आणि माझ्या वकिलीला व कायद्याच्या प्राध्यापकीला औरंगाबादमध्ये प्रारंभ झाला.

विधि महाविद्यालयातील प्राध्यापकीचा माझा उत्साह मात्र फार लवकर मावळला. प्राचार्य आय.व्ही.के. शास्त्री आणि आणखी एक प्राध्यापक एवढेच पूर्णवेळ होते. शहरातील काही नामवंत वकील इतर वर्ग घेत. त्यात महाविद्यालयाच्या संचालक मंडळातील काही व्यक्तीही होत्या. भारतीय दंडसंहिता, पुराव्याचा कायदा, संपत्ती हस्तांतरणाचा कायदा, मुदतीचा कायदा असे वकिलीत नेहमी उपयोगात येणारे सर्व कायदे हे वकीलच अनेक वर्षांपासून शिकवत होते. मला शिकवण्यासाठी विषय देताना साहजिकच त्यांनी न घेतलेले विषय प्राचार्यांनी निवडून दिले. त्यात आंतरराष्ट्रीय कायदा, कूळ आणि रयतवारी पद्धत असे काही विषय माझ्या वाट्याला आले. वकिलीच्या दैनंदिन कामात त्या विषयांचा फार कमी संबंध येई. एक तास शिकवण्यासाठी मला तीन- चार तास अभ्यास करून त्या विषयाची उजळणी करावी लागे आणि या सर्व उपातापाबद्दल एका तासाचे दहा रुपये मला मिळत. वाहनाच्या खर्चासाठीही ते पैसे पुरत नसत. शिवाय न्यायालयात चालववायाच्या प्रकरणांच्या अभ्यासाला मी जो वेळ खर्च करू शकलो असतो तो तिकडे द्यावा लागे. आणखी एक गोष्ट म्हणजे मराठी भाषा आणि वाङ्मय यांचे अध्यापन करताना मला जो आनंद वाटे तसा या अध्यापनात वाटत नव्हता. विधि महाविद्यालयातील प्राध्यापकीचा महिना- दीड महिन्यातच कंटाळा येऊन मी राजीनामा दिला आणि पूर्णवेळ वकिली करण्याचे ठरवले. माझ्या रिकाम्या झालेल्या जागेवर नंतर शिवराज पाटील चाकूरकर यांची नेमणूक झाली. शिवराज पाटील यांनी पुढे लोकसभेचे सभापती, गृहमंत्री, राज्यपाल वगैरे पदे भूषविली.

नावंदरांकडे सर्वच प्रकारचे काम होते. जी जी केस मी चालवतो असे म्हटले ती ती मला नावंदरांनी चालवावयाला दिली. नावंदर वयाने ज्येष्ठ आणि माझे सिनियर असले तरी त्यांचे माझे संबंध बरेचसे मित्रासारखे असत. औरंगाबाद शहरातील विविध न्यायालयातील कामे त्यांच्याकडे तर होतीच; शिवाय आठवड्यातून किमान एक- दोन दिवस तरी त्यांना गंगापूरला जावे लागे. त्यामुळे त्यांच्याकडे काम करणाऱ्या आम्हा दोन- तीन ज्युनिअर्सना दररोज काम मिळतच असे. वकिलीचा हा प्रारंभ बराचसा उत्साहवर्धक होता. वकिलीचे काम भरपूर असूनही नावंदरांचा बराच वेळ समाजवादी पक्ष आणि इतर सार्वजनिक कामे यांच्यात जाई. माझ्याही आवडीचे हे विषय असल्यामुळे त्यातही आम्ही सहकारी बनलो. औरंगाबादला येणाऱ्या समाजवादी नेत्यांचे आगतस्वागत ही नावंदरांचीच जबाबदारी समजली जात असे. त्या काळात मोटारी कमी होत्या. एक जुनी हिलमन गाडी त्यांच्याकडे होती. ती गाडी या कामासाठी वापरली जाई. जिल्ह्यात आमच्या पुढाऱ्यांना कोठेही दौरा करण्यासाठी नावंदराची गाडी उपलब्ध असे. वकिलीचे प्राथमिक धडे तर मी घेतलेच; शिवाय चार- पाच महिन्यांच्या काळात मी नावंदरांचा कुटुंबीयही झालो.

औरंगाबादच्या अदालत रोडवरील न्यायालयीन संकुलात दिवाणी व फौजदारी न्यायालये होती. तर बाजूच्याच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत महसूल न्यायाधिकरणाचे कार्यालय होते. जिल्हाधिकारी

कार्यालय आणि विभागीय आयुक्तांचे कार्यालय मात्र तेथून सुमारे ३ कि.मी. अंतरावर फाजलपुऱ्यात होते. हैदराबाद भाडेनियंत्रण कायद्याखालील प्रकरणे चालवण्याचे अधिकार उपजिल्हाधिकाऱ्यांना असत आणि महसूल व कूळकायद्याखालील प्रकरणे उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी व महसूल आयुक्ताकडे चालत. औरंगाबादमध्ये तेव्हा सार्वजनिक वाहनव्यवस्था म्हणजे फक्त घोड्याचे टांगे. दरमाणसी बाराआणे-रुपया देऊन तांग्यातून जावे लागे. फाजलपुऱ्यातील एक चक्कर म्हणजे तीन तास मोडत. महसूल अधिकाऱ्यांना समोरील प्रकरणांचे निकाल देण्याच्या कामाबरोबरच इतर अनेक कामे असत. पुष्कळ वेळा इतर कामांनाच प्राधान्य मिळत असल्यामुळे त्यांच्यासमोरील प्रकरणे वेळेवर चालतच नसत. साहेब दौऱ्यावर गेले आहेत, मंत्र्यांनी मुंबईला बोलावले आहे अगर साहेब इतर बैठकीत गुंतले आहेत अशा अनेक कारणांनी प्रकरणे वाढत असत. काही महसूल अधिकारी कर्तव्यदक्ष असले तरी अशा अडचणीसमोर त्यांचाही इलाज नसे. नुसताच हेलपाटा होई आणि नवी तारीख घेऊन परत यावे लागे. जागा परत मिळण्यासाठी घरमालकाने भाडेकरूविरुद्ध दाखल केलेल्या प्रकरणाचा निकाल ५-७ वर्षे लागतच नसल्यामुळे भाडेकरू निर्धास्त असत.

कूळ आणि इतर महसूल कायद्याखालील प्रकरणातील निगराणीचे (रिव्हीजनचे) अर्ज महसूल न्यायाधिकरणासमोर चालत. विधि महाविद्यालयात माझे प्राचार्य असलेले बॅ. विश्वनाथ दास, हैदराबाद उच्च न्यायालयाचे काही काळ न्यायाधीश असलेले विठ्ठल रंगराव देशपांडे आणि एक निवृत्त जिल्हाधिकारी कलीमुल्ला कादरी असे तिघे महसूल न्यायाधिकरणाचे सदस्य होते. या तिघांचाही कामाचा उरक व कायद्याची समज चांगली होती. त्यामुळे त्या काळात महसूल न्यायाधीकरणात काम करणे हा आनंदाचा अनुभव होता. काही वकील मंडळींना मात्र शिस्तशीर कामाची सवयच नव्हती. एका वकिलांचे स्वत:चेच कूळकायद्याखालील एक प्रकरण होते. त्यांनी आपल्या एका मित्राला वकीलपत्र दिले होते. दाससाहेबांच्या समोर कित्येकवेळा प्रकरणे झपाट्याने संपत. पूर्वीच्या दोन प्रकरणांना किती वेळ लागेल याबद्दलचा अंदाज बांधून हे दोघे मित्र न्यायाधिकरणाच्या इमारतीबाहेर असलेल्या पानवाल्याकडे पान खाण्यास गेले. तेथे पान खाऊन जेव्हा ते परत आले तोपर्यंत त्यांचे प्रकरण पुकारले गेले होते व अर्जदारातर्फे कोणीही हजर नसल्यामुळे दाससाहेबांनी ते खारीज केले होते. दोन्ही वकीलमित्र परत आल्यावर त्यांनी दाससाहेबांना तोंडी विनंती केली असती तरी प्रकरण पुन्हा सजीव झाले असते; त्याऐवजी 'आमचे प्रकरण खारीज कसे केले, आम्ही तर इथेच होतो अशी हुज्जत घालण्यास त्यांनी सुरुवात केली. दाससाहेबांनी शांतपणे 'तुम्ही अर्ज द्या, मी प्रकरण पुन्हा नंबरावर घेतो' असे तीन- चार वेळा सांगितले; परंतु दोघांनीही ताबडतोब तसे केले नाही. एखादे प्रकरण वकिलाच्या किंवा पक्षकाराच्या गैरहजेरीमुळे खारीज केले गेले तर ते तोंडी विनंतीवरून किंवा अर्जावरून लगेच पुन्हा जीवंत होते. मात्र जर असा अर्ज दुसऱ्यादिवशी दिला तर विरुद्ध बाजूला नोटीस काढून त्यांचे म्हणणे ऐकावे लागते अशी प्रथा आहे. या दोन मित्रांच्या वितंडवादामुळे त्या दिवशी अर्ज दिला गेलाच नाही आणि नंतर दिल्यानंतर बऱ्याच अडचणी येऊन पक्षकार वकीलसाहेबांचे नुकसान झाले.

भाडेनियंत्रण कायदा औरंगाबाद शहराला लागू होता. या कायद्याचा मूळ उद्देश बाजूला राहून मालकाला त्रास देण्याचे हत्यार म्हणूनही केव्हा केव्हा त्याचा उपयोग होई. या कायद्याखाली काही श्रीमंत भाडेकरू गरज नसताना जागा ताब्यात ठेवण्याचे प्रकार करीत असत. अशाच एका लक्षाधीश भाडेकरूने जागा सोडण्यासाठी काही हजार रुपये मागितले. जागामालक आणि भाडेकरू दोघेही एवढ्या सुस्थितीत होते की ३०-४० हजारांनी त्यांना काहीही फरक पडत नव्हता. ही रक्कम घरमालकाने भाडेकरूला दोन्ही बाजूच्या वकीलासमक्ष दिली. गरीब भाडेकरूच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा हाही उपयोग मी पाहत होतो. या प्रकरणात मात्र अपवादात्मक गोष्ट अशी घडली की भाडेकरूला नंतर पश्चाताप झाला आणि ती सर्व रक्कम त्याने घरमालकाला परत केली.

प्राध्यापकी सोडल्यानंतर जर फक्त वकिलीच करावयाची तर सरळ वडलांच्याजवळ घरच्या ऑफिसमध्येच का करू नये, असा विचार करून मी बीडला जाण्याचे ठरवले. साधारणत: १९६२ च्या

नोव्हेंबर महिन्यात मी बीडला वडलांच्या हाताखाली वकिली सुरू केली. आयुष्याची एक दिशा आता निश्चित झाली होती.

पन्नास वर्षांपूर्वीचे बीड एक सुस्त गाव होते. एखादे मोठे आणि जरा चांगल्या स्थितीतले खेडे असावे असे वातावरण होते. दर रविवारी गावाच्या मधोमध वाहणाऱ्या बिंदुसुरा नदीच्या काठावरच्या वाळवंटात बाजार भरे. भाजी थोडीफार आमच्या वाड्याजवळ बागवानाकडे मिळे. कधी सकाळी शेजारपाजारच्या गावाहून येणाऱ्या दही- दूध विकणाऱ्या बरोबर थोडी भाजी येई. पण मुख्यत: रविवारच्या बाजारात भाजी खरेदी होई. केळी आणि आंबे हीच मुख्यत: फळे. आज दिसणारी इतर फळफळावळ ही त्यावेळी अज्ञातच होती. रविवारच्या बाजारात खेड्यातील ग्राहकांसाठी अनेक उपयुक्त वस्तू मिळत. कोयते, अडकित्ते तर असतच; शिवाय चष्मेही असत. एका टोपलीत ५०-६० चष्मे घेऊन विक्रेता बसलेला असे. ग्राहकाने टोपलीतला चष्मा घ्यावा व आपल्याला बरे दिसते हे पहावे. ज्या चष्म्याने बरे दिसेल तो आपला नंबर असा साधा प्रकार असे. डोळ्याचा डॉक्टर अजून गावात निर्माणच झाला नव्हता. चष्म्याची किंमतही माफक, काही आण्यात किंवा फार झाले तर एखादा रुपया असे. कित्येक पक्षकार मूग, मटकी, तीळ, जवस असे काही विकायला घेऊन येत. विकल्यावर त्या पैशातून आठवड्याचा बाजार करीत. लवकर आटोपले तर गावी परत जात. उशीर झाला तर आपल्या वकिलाच्या घरी मुक्काम करीत. बहुतेक वकिलाच्या घरी पक्षकारांसाठी एखादी मोठी संतरजी, तक्क्या, पाण्याचा माठ असा सगळा सरंजाम असे. पुढे गावात नळ आले. आमच्या बंगल्यात समोरच्या भागात एक स्वतंत्र नळ पक्षकारांच्या उपयोगासाठी असे. आमचा दुधवाला आणि त्याचे काही समव्यवसायी त्याच नळाचे पाणी आपल्या दुधात मिसळत आणि मग गावात विक्रीला जात. हरिभाऊ नावाचे बीड जवळच्याच एका गावातले एक शेतकरी दुधाचा जोडधंदा करीत. आमच्या घरीही तेच दूध घालत. हरीभाऊही गावाकडून कॅनमध्ये दूध घेऊन येत व आमच्या नळाचे पाणी त्यात मिसळून मग ग्राहकांच्या घरी रतीब घालत. काकांनी (माझ्या वडलांनी) आपला एक जुना काळा कोट हरिभाऊंना थंडीपासून रक्षणासाठी दिला होता. तो कोट हरिभाऊ नेहमी वापरत. काका त्यांना विनोदाने म्हणत ''हरिभाऊ, दुधात पाणी घालताना तो काळा कोट थोड्या वेळ काढून ठेवत जा. बेकायदेशीर कामे करताना निदान काळा कोट घालू नये .''

आमच्या घराच्या मागच्या बाजूला लिंबू, चिकू, बोर, जांभळ अशी काही झाडे काकांनी लावली होती. मी वकिलीला आल्यावर थोडीशी फुलबागही केली होती. पक्षकार सावलीत बरोबर आणलेल्या दशम्याचे गाठोडे सोडून न्याहरी करीत आणि मग कोर्टात जात. त्यात आमचेच पक्षकार असत, असे नाही. काहीवेळा तर न्यायालयात एकमेकाविरुद्ध भांडणारे दोन्ही पक्षकार बरोबर जेवत असत. एका पती- पत्नीचे भांडण न्यायालयात चालू होते. एकदा सहज पाहिले तर दोघेही आमच्या परसबागेमध्ये एकत्र जेवत होते. पत्नीचा वकील मी होतो. मी त्यांना विचारले की 'हा काय प्रकार आहे? तुमचे भांडण खरे नाही काय? मग कोर्टात मिटवत का नाही?' बाईने सांगितले की 'माझ्या भावाच्या विरुद्ध माझा नवरा ग्रामपंचायत निवडणुकीला उभा राहिला त्यामुळे बिथरून भावाने मला जबरदस्तीने कोर्टात केस करावयास लावली आहे.' शेवटी तिच्या भावाची समजूत काढून ते प्रकरण मी काढून घ्यावयास लावले. असाच एक पिंपळनेर गावचा खटला चालू होता. मारवाडी समाजातले पिता-पुत्र वाटणीबद्दल भांडत होते. भांडण कोर्टात होते; परंतु दोघांनीही आपले नाते सोडलेले नव्हते. ज्या दिवशी तारीख असेल त्या दिवशी सकाळी सूनबाई नवरा आणि सासरा या दोघांच्याही दशम्या करायची. मुलाने बैलगाडी जुंपायची, गाडीत गादी अंथरायची, टेकायला तक्क्या ठेवायचा, बापाला हात धरून गाडीत बसावयाचे, बायकोने दिलेल्या दशम्या बरोबर घ्यायच्या आणि दोघे बीडला यायचे. माझ्या दारासमोर मोठी मोकळी जागा म्हणून गाडी तेथे सोडायची, बैलांना वैरण घातली की मुलाने वडलांना हाताला धरून समोरच असलेल्या त्याच्या वकिलाकडे पोहोचवावयाचे आणि नंतर आपल्या वकिलाची म्हणजे माझी भेट घ्यायची नंतर दोघेही कोर्टात जाऊन भांडण पुढे चालवावयाचे. वाद वादाच्या जागी आणि नाते नात्याच्या जागी अशी व्यवस्थित विभागणी होती.

बीडला तेव्हा जिल्हा न्यायाधीश, एक साहाय्यक जिल्हा न्यायाधीश, एक दिवाणी न्यायाधीश उच्चस्तर व एक दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर अशी चार न्यायालये होती. कधी कधी आणखी एखादा कनिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश येई. दिवाणी काम बरेच होते. शहरात गुन्हेगारी फारशी नव्हतीच. जमिनीच्या वादावरून किंवा इतर अदावतीवरून झालेले खून, अगदीच क्वचित दहा पाच वर्षांत झालेला एखादा बलात्कार अशी मुख्यत: मोठी फौजदारी प्रकरणे. दखलपात्र नसलेल्या गुन्ह्याबद्दलच्या खासगी फिर्यादी थोड्या असत. पण त्यांचे प्रमाण पावसाप्रमाणे कमीजास्त होई. पाऊस चांगला झाला आणि पीक चांगले येणार असेल तर एखाद्याने केलेला अपमान, मारलेली थप्पड अगर शिवीगाळ सहन न होऊन माणसे वकिलाकडे धाव घेत. मात्र जर पाऊसच पडला नाही तर झालेला अपमान गिळून टाकत आणि जागी स्वस्थ बसत. तसा सगळाच वकिली व्यवसाय शेतीवर अवलंबून होता. प्रकरणातील फी ठरवताना त्या केसच्या स्वरूपाबरोबरच त्यावर्षी झालेले किंवा होऊ शकणारे पीक- पाणी हाही महत्त्वाचा मुद्दा असे. फीच्या मुद्यावरून पक्षकाराला परत पाठवण्याची पद्धत नव्हती. बहुतेक वकिलांना थोडीफार शेती असे व ती कूळे वहिवाटत. वकील हा नुसताच कायदेशीर सल्लागार नव्हता तर तो कुटुंबाचा मित्र होता. कुटुंबात घडणारे बरेवाईट त्याच्याही कानावर घातले जाई आणि शेतात पिकलेल्याचा वानवळा वकिलाची घरी पोहचता होई. बीडजवळ काकडहिरा नावाचे एक गाव आहे. गाव डोंगरात आहे. तेथले अण्णा बागलाणे नावाचे आमचे एक पक्षकार माझ्या चांगले लक्षात आहेत. चार- दोन दिवसाला त्यांची बीडला चक्कर असायची. काकडहिऱ्याजवळ डोंगरात मोर पुष्कळ होते. मोराची पिसे माझ्यासाठी अण्णा मुद्दाम आणीत. शिवाय त्यांच्या शेतातली भाजीही येई. राघवेंद्रराव ओपळकर नावाचे काकांचे एक शिक्षक होते. त्यांचे एक प्रकरण काकांनी चालवले. फी अर्थातच घेतली नाही. राघवेंद्रराव मास्तर हयात असेपर्यंत दरवर्षी एक - दोनदा तरी त्यांच्या शेतातील भाजी येत असे.

काकांचा - माझ्या वडलांचा एक निष्णात दिवाणी वकील म्हणून लौकिक होता. दिवाणी कायद्यातील अवघड प्रश्नाबद्दल इतर वकील त्यांच्याशी चर्चा करीत. फौजदारी काम त्यांनी कधी केलेच नाही. त्यांच्या मनोभूमिकेशी ते सुसंगत नव्हते. जिल्हा न्यायालयात ज्या तीन- चार वकिलांकडे दिवाणी अपिले मोठ्या प्रमाणात होती त्यात काका होते. काकांचे अक्षर वळणदार व सुवाच्य असे. एखाद्या प्रकरणात विवेचन करण्यापूर्वी न्यायालयाची फाईल पूर्णपणे पाहून त्याची टिपणे आपल्या फाईलवर ते करून घेत. एखादा दावा दाखल करण्यापूर्वी जे कायद्याचे मुद्दे त्यात उपस्थित होऊ शकतील त्यांचा अभ्यास करून मग त्या आधाराने दाव्याची रचना करावयाची ही त्यांची पद्धत होती. न्यायालयात दाखल केलेला प्रत्येक कागद हाताने पूर्ण लिहिल्यानंतर किंवा टंकलिखित झाल्यावर पुन्हा वाचून पाहावा असे त्यांचे म्हणणे असे. पुन: न वाचता कोणताही मजकूर न्यायालयात दाखल केलेला त्यांना चालत नसे. मला वकिलीला दहा- बारा वर्षे झाल्यानंतर व माझ्याकडेही दोन- तीन ज्युनिअर्स काम करत असताना त्या सर्वासमक्ष त्यांनी एका दाव्यातील कैफियत न तपासता तशीच दाखल केल्याबद्दल माझी कानउघडणी केली आहे.

काकांचा दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे सचोटी. एखाद्या प्रकरणात यशाची आशा की नाही व कायद्याची स्थिती काय आहे हे आलेल्या पक्षकाराला स्पष्ट सांगणे हा त्यांचा रिवाज होता. कायद्यातील तरतुदी किंवा न्यायालयासमोर दाखल झालेली कागदपत्रे याबाबत यथातथ्य माहितीच न्यायालयाला सांगणे हे वकिलाचे कर्तव्य आहे असे ते मानत. पक्षकारांची बाजू मांडतानाही कायद्यातील तरतुदीबाबत चुकीचे विधान त्यांनी कधीही केले नाही. विवेचनात साक्षीपुराव्याचा ते सारांश सांगत तेव्हा न्यायाधीशांना त्यातील तथ्ये मूळ कागदपत्रावरून तपासून पाहण्याची गरज वाटत नसे. अगदी नवीन असलेल्या कनिष्ठ न्यायाधीशासमोर आपल्या पक्षकाराची बाजू मांडल्यानंतर विरुद्ध बाजूच्या वकिलासा उत्तर न देता आल्यामुळे कायद्याच्या तरतुदीबाबत त्या नवख्या न्यायाधीशाचीही चुकीची समजूत होऊ नये याबद्दल त्यांना काळजी वाटे. न्यायाधीशाला कायद्याचा चुकीचा अर्थ सांगून म्हणजे एकाप्रकारे फसवून आपल्यासारखा निकाल मिळवणे हा अनीतीमान प्रकार आहे असे ते मानत. काकांची ही निष्ठा माहीत असल्यामुळे एका न्यायाधीशांनी माझ्यासमोर काकांना चेंबरमध्ये बोलावून घेतले आणि विचारले की 'तुम्ही जे निवाडे

दाखवले आणि विशिष्ट तरतुदीबाबत एक दृष्टिकोन सांगितला त्यापेक्षा वेगळा दृष्टिकोण काही न्यायालयांनी घेतला आहे काय?' काकांनी होकारार्थी उत्तर देऊन आपल्याविरुद्धचे निवाडे ग्रंथालयातून काढून न्यायाधीशांना दिले व तीच म्हणजे विरुद्धबाजूची बाजू बरोबर असल्याचे सांगितले.

घरातच असलेले काकांचे वकिलीचे ऑफिस आज प्रथितयश वकिलाचे असते तसे टापटिपीचे आणि भारदस्त मात्र नव्हते. बंगल्याचे बांधकाम अर्धवट राहिलेले होते. तशाच अवस्थेत आम्ही वाडा सोडून नव्या बंगल्यात राहावयास आलो होतो. आमच्या गावाच्या मानाने काकांनी केलेले बांधकाम भव्यच म्हणावे लागेल. वीस हजार चौरसफुटाच्या प्लॉटवर ७५ बाय ७० फूट चौथरा आणि तोही ७ फूट उंच, त्यावर आमचे घर बांधले होते. २० फूट लांब आणि १२ फूट रुंद असे दोन मोठे हॉल दर्शनी भागात होते आणि त्यांची उंची चांगली १६ फूट होती. भल्यामोठ्या लाकडी नाटा मुद्दाम मिळवून त्यावर मद्रास टेरेस पद्धतीचे बांधकाम चुन्यात केले होते. त्यामुळे एखाद्या शासकीय कार्यालयासारखे आमचे घर आतून दिसे. समोरचा व्हरांडा मात्र पत्रे आच्छादिलेला होता. एका निवृत्त तहसीलदाराकडून काही जुने पण चांगल्या स्थितीतले फर्निचर काकांनी विकत घेतले होते व त्यावरच काम चालू होते. महत्त्वाच्या दिवाणी कायद्यांची मोठी सटीक पुस्तके होती; पण लॉ रिपोर्टस् कमी होते. हैदराबाद मुक्तीपर्यंत तर स्वातंत्र्याची चळवळ हेच काकांचे प्रधान काम होते आणि उरलेल्या वेळेत जमेल तेवढी वकिली. त्यानंतर १९५६ पर्यंत ते सक्रिय राजकारणात होते, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्षही होते. त्याही काळात वकिलीला अधिक वेळ त्यांना देता आला नाही. त्यानंतर राजकारणाचे स्वरूप बदलले. बदललेल्या स्वरूपाच्या राजकारणात काकांना आणि त्यांच्यासारख्यांना फारशी भूमिकाच नव्हती. नंतर मात्र काकांनी वकिलीला पूर्ण वेळ दिला आणि हळूहळू त्यांचे काम आणखी वाढत गेले.

चळवळीच्या काळात बीड जिल्ह्यातल्या बहुतेक गावात काका गेले होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत बहुजन समाज मोठ्या प्रमाणात प्रथम आष्टी तालुक्यात सामील झाला होता. या तालुक्याशी काकांचे विशेष संबंध होते. अनेक कार्यकर्त्यांशी जवळीक होती. या तालुक्यातील बहुतेक न्यायालयीन प्रकरणात एक बाजू काकांच्याकडे असे. आष्टीचा हा लोभ माझ्यावरही कायम होता. शिवाय जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातून येणाऱ्या महत्त्वाच्या दिवाणी अपिलात काकांच्याकडे एका बाजूचे वकीलपत्र बहुधा असे. १९५० ला बीडला सत्रन्यायालय सुरू झाले व त्यात काम करण्यासाठी अंबाजोगाईचे मधुसुदनराव वैद्य व पुरुषोत्तमराव चौसाळकर असे काही वकील बीडला वकिली करण्यास आले. यातील वैद्यांचा काकांशी विशेष स्नेह झाला. वैद्य हे सरळ मनाचे, सचोटीचे आणि अभ्यासू वकील. सार्वजनिक कामात त्यांचाही सहभाग असे. जिल्हा न्यायाधीश किंवा सहायक जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे चालणाऱ्या दिवाणी अपिलात काका आणि वैद्य याच दोघांकडे बरेच काम असे. १९५२ साली पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत काका अंबाजोगाई मतदारसंघातून विधानसभेसाठी उभे राहिले त्यावेळी वैद्यांनी त्यांच्या प्रचाराचा काही भार सांभाळला.

काका आणि मधुसूदनराव वैद्य हे दोघेही फक्त मॅट्रिक उत्तीर्ण झालेले होते. हैदराबाद संस्थानात एलएल.बी.च्या ऐवजी उच्च न्यायालयाची त्याच दर्जाची परीक्षा पास होणे पुरेसे असे. ही परीक्षा उर्दूत होई व न्यायालयाचे कामकाजही उर्दूत चाले. तरीही या दोघांचे इंग्रजी नंतरच्या पिढीतील आमच्यासारख्या पदवीधरापेक्षा चांगले असे. १९५६ नंतर जेव्हा बीडच्या न्यायालयात उर्दूऐवजी इंग्रजी आणि मराठीत काम सुरू झाले त्यावेळी प्रथमत: इंग्रजीत विवेचन (बहस) काका आणि वैद्य यांनीच केले. एखादा गुंतागुंतीचा मुद्दा असेल तर त्याबद्दल वैद्य आणि काका यांची चर्चा ऐकणे हा एक शिक्षण देणारा अनुभव असे. या दोघांच्या दिवाणी कायद्याच्या व्यासंगाबद्दल परिचितात मोठा आदर असे, एकदा पक्षकाराच्या आग्रहावरून एका दिवाणी प्रकरणात मुंबईच्या एका वकिलाकडे मी सल्ला घेण्यास गेलो तर 'तुमच्या घरातच चांगला सल्ला मिळू शकत असताना तुम्ही येथवर कशाला आला?' असा प्रश्न त्यांनी मला विचारला.

काका आणि वैद्य या दोघांवर न्यायालयाचा आणि तेथील कर्मचाऱ्यांचा प्रचंड विश्वास असे. जिल्हा

आणि साहाय्यक जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयात दर दिवशी चार-चार, पाच-पाच प्रकरणात काका आणि वैद्य हेच दोघे एकमेकांच्याविरुद्ध असत. दोघेही तारीख वाढवून देण्याची विनंती सहसा करीत नसत. एकदा काही दिवस काका व वैद्य दोघेही कामाच्या प्रचंड ओझ्याखाली होते. त्या काळात त्यांच्या सोयीसाठी एक गोष्ट शिरस्तेदाराने केली. शिरस्तेदार त्यांच्याच परिचितांची मुलेच असत. एक शिरस्तेदार दुसऱ्या दिवशी कोर्टात चालणाऱ्या, ज्यात हे दोघे वकील आहेत अशा, अपिलाच्या संचिका कोर्ट संपल्यावर आमच्या घरी घेऊन येई व ठेवून जाई. काका रात्री दोन- तीन तास त्या सर्व संचिका पाहून ठेवत व दुसऱ्या दिवशी सकाळी सहाच्या सुमाराला जवळच असलेल्या वैद्यांच्या घरी नेऊन देत. वैद्य सकाळी दोन तास त्या संचिका पाहून ठेवीत. शिरस्तेदार घरून कोर्टाला जाताना त्या संचिका वैद्यांच्या घरून घेऊन जाई. न्यायालयाची संचिका एखाद्या वकिलाच्या घरी नेणे हा आज अगदीच अक्षम्य प्रकार मानला जाईल. पण तेव्हा काळ वेगळा होता. काका आणि वैद्य या दोघांच्याहीबद्दल प्रचंड विश्वास होता. आज असे घडणे कठीण आहे. एखाद्या वकिलास न्यायालयातही संचिका पाहावयाची असेल तर संबंधित कारकून त्यावेळी समोर बसतो. एवढी काळजी घेऊनही न्यायालयीन संचिकेतील अनेक मूळ कागदपत्रे गायब होण्याचे प्रकार हल्ली होतात. एक उदाहरण सांगण्यासारखे आहे.. स्वातंत्र्यसैनिकांना निवृत्तिवेतन वगैरे फायदे जेव्हा मिळू लागले तेव्हा त्या लाभासाठी स्वातंत्र्यसैनिक बनण्याचे प्रयत्न काहींनी सुरू केले. चळवळीच्या संदर्भातील एखाद्या फौजदारी खटल्यात आरोपी म्हणून नाव असले म्हणजे स्वातंत्र्यसैनिकाचे प्रमाणपत्र मिळणे सोपे जाई. एका तरुण वकिलाने न्यायालयाच्या अभिलेखागारात रजिस्टरे पाहता पाहता जुन्या फौजदारी प्रकरणांच्या रजिस्टरमध्ये एका खटल्यातील आरोपींच्या यादीत आपल्या बापाचे नाव घुसडले. नवी शाई, बदललेले अक्षर, चुकीचा क्रमांक वगैरे गोष्टीमुळे हा प्रकार उघडकीला आला. वकीलसाहेबांना हातापाया पडून आपली सुटका करून घ्यावी लागली.

वैद्यांना त्यांच्या मुलाप्रमाणेच मीही भाऊ म्हणत असे. भाऊ एकदा विषमज्वराने आजारी पडले. सुमारे दोन महिने ते अंथरुणाला खिळूनच होते. काका या काळात त्यांचेही दप्तर सांभाळत. ज्या प्रकरणात काकाकडे विरुद्धबाजूचे वकीलपत्र होते तेवढी प्रकरणे वैद्यांच्या वतीने इतर कोण्या वकिलाला पाहवयास काका सांगत. काका रोज वैद्यांच्या घरी जाऊन संचिका पाहून व पक्षकारांशी बोलून न्यायालयात त्यांचेही काम ते चालवीत. दोघांचा हा स्नेह सार्वजनिक जीवनातसुद्धा उपयोगी होई. मी वकिलीला आल्यानंतर दोन - तीन वर्षांनी भाऊंनी एकदा आम्हा सात- आठ तरुण वकिलांना आणि त्यांच्या काही मित्रांना बोलावून घेतले आणि सार्वजनिक वाचनालयाचे पुनर्जीवन करण्याची कल्पना मांडली. आमच्यापैकी बहुतेकांना ते आवडले आणि अनेक वर्षे बंद पडलेले बीडचे सार्वजनिक वाचनालय नव्याने सुरू झाले. भाऊंच्या पुढाकारामुळे वाचनालयाच्या कामासाठी आम्हा तरुणांचा एक गट उभा राहिला. मधुकर वाडगावकर, दत्तात्रय ओपळकर, साहेबराव कदम असे काही वकील व देवीदास माळेवाडीकरासारखे काही शासकीय कर्मचारी अशी आमची मित्रमंडळी झटून काम करत असे. वाचनालयाच्या जागा बदलली तर पुस्तकाचे गठ्ठे तिकडे वाहून नेणे, पुस्तके कपाटात क्रमवारीने लावणे अशी सर्व कामे आम्हीच करू असू. रूक्ष शासकीय सेवेत असूनही माळेवाडीकराने आपली वाङ्मयाची आणि सार्वजनिक कामाची आवड कायम ठेवली होती. त्यावेळी बीडला मंगल कार्यालय नव्हते. एखाद्या परिचिताच्या घरी लग्नकार्य निघाले की माळेवाडीकर, आमलेकर, वाडगावकर अशी सात-आठ तरुण मंडळी खांद्यावर पंचे टाकून स्वत:च कामाला हजर होत व पडेल ते काम करीत. त्या काळात ती फारच मोठी मदत होती.

या दोघांच्या पुढाकाराने सुरू झालेला आणखी एक उपक्रम म्हणजे सर्व समाजाच्या वतीने साजरी केली जाणारी डॉ. आंबेडकर जयंती. आंबेडकरांचे विभूतिमत्त्व सर्वच समाजासाठी आदरणीय आहे ही भावना मनात धरून आंबेडकर जयंती केवळ दलितांनी साजरी करण्याऐवजी सर्वांनी एकत्रितपणे साजरी करावी अशी ती कल्पना होती. दोन- तीन वर्षे अतिशय शिस्तबद्ध मिरवणुका काका आणि वैद्य यांच्या पुढाकाराने निघाल्या. मिरवणुकीत कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, घोषणासुद्धा ठरलेल्याच देण्यात याव्यात असा नियम करण्यात आला होता व दलित समाजातील जाणत्या तरुण कार्यकर्त्यांच्या मदतीने

तो पाळण्यात येत असे. पुढे त्यात विस्कळीतपणा आला आणि दलित व दलितेतर अशा सर्व समाजाच्या वतीने एकत्रितपणे होणारा हा उपक्रम चालू राहिला नाही. सार्वजनिक वाचनालयातच काका आणि वैद्यांनी एक 'डॉ.आंबेडकर प्रबोधिनी' स्थापन केली होती. अनेक विचारवंतांची व्याख्याने या प्रबोधिनीच्या वतीने झाली. आम्हा तरुण वकिलांना हा एक आदर्श होता.

निजामी राजवटीच्या काळात मोठे फौजदारी खटले चालवणारी सत्र न्यायालये फक्त विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी (सुभेदारी) असत. औरंगाबाद, गुलबर्गा, वरंगल आणि हैदराबाद येथेच फक्त सत्र न्यायालये होती. १९५० च्या सुमाराला बीडला सत्र न्यायालय सुरू झाले. निजामी राजवट संपल्यामुळे उर्दू जाऊन त्या जागी इंग्रजी व मराठी आले होते. निकालपत्रे इंग्रजीत आवश्यक झाली आणि न्यायालयात एक नवे युग सुरू झाले. अनेकांनी आयुष्यभर उर्दूत काम चालवले होते. त्यांना हा बदल स्वीकारावयाचा होता. शामराव बाहेगव्हाणकर नावाचे एक वकील केवळ चौथीपर्यंत शिकलेले होते. त्यानंतर लॉ क्लास उत्तीर्ण होऊन त्यांनी वकिली सुरू केली. वकिलीत त्यांच्याकडे भरपूर काम होते. वयाची पन्नाशी उलटून गेल्यानंतर त्यांनी इंग्रजी अक्षरओळख करून घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या ऑफिसमध्ये दोन- तीन एलएल.बी. झालेले ज्युनिअर्स असत. त्यांच्याकडून उच्च न्यायालयांच्या इंग्रजी निवाड्यांचे सारांश वाचून घ्यावयाचे व त्याचा अर्थ समजून घ्यायचा असा क्रम त्यांनी सुरू केला. भाषेच्या, नव्या कामकाज पद्धतीच्या अनेक अडचणी आल्या तरी शामरावांनी त्यावर मात करण्यासाठी खूप परिश्रम केले. एवढ्या वयातही शामराव केसच्या तयारीसाठी त्यांच्या पद्धतीनुसार भरपूर मेहनत घेत. एखाद्या खटल्यात काही आरोपीतर्फे ते व काहीतर्फे मी असे असलो तर शामरावांचा निरोप येई 'रात्री फाईल घेऊन ये.' रात्री नऊ- दहा वाजता मग शामरावांच्या कार्यालयात मी काय तयारी केली आहे याची झडती होई. फौजदारी प्रकरण चालवण्याबद्दल शामरावांचा दृष्टिकोन परंपरागत असे. पोलिस जबानी आणि कोर्टातील जबानी यात जास्तीत जास्त फरक आणावयाचा, मग ते मुद्दे किरकोळ का असेनात, अशा contradictions ना महत्त्व देण्याची ती पद्धत असे. साक्षीदार फिरले तर ते हवेच असत. सामान्यत: माझा भर एखाद्या घटनेच्या किंवा साक्षीदाराने सांगितलेल्या हकिगतीच्या शक्याशक्यतेवर असे. असे घडू शकेल किंवा घडू शकणार नाही हे मानवी जीवनाच्या अनुभवावरून ठरवणे हा विश्वसनीयता ठरवण्याचा अधिक योग्य मार्ग आहे, असे मला वाटे. दोघांच्या दृष्टिकोनात फरक असला तरी शामराव जे परिश्रम करीत ते मात्र अनुकरणीय असत.

निजामी राजवटीच्या काळात अधिकाऱ्यांना खुश ठेवणे हा यशाचा राजमार्ग समजला जाई. सरकारी अधिकाऱ्यांपैकी व न्यायाधीशांपैकी लाचखाऊ थोडेच असत. परंतु इतरांनाही खुश करण्याचे अनेक मार्ग असत. अधूनमधून त्यांच्याकडे फळांच्या करंड्या पाठवणे हा त्यातला एक होत व ते त्या काळात क्षम्य समजले जाई. स्वातंत्र्यानंतर भिकाजीपंत पाटील पहिले जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून बीडला आल्यानंतर त्यांच्याकडे अशीच फळाची करंडी एका वकिलाकडून आली. पाटलांनी ती परत तर केलीच; शिवाय असा प्रकार पुन्हा झाला तर मी त्याची गंभीर दखल घेईल असा दमही दिला.

फौजदारी वकिलीत यश मिळविण्यचे बरे-वाईट दोन्ही मार्ग असतात. काही यशस्वी वकिलांचे स्वत:चे दलाल असत. ते काम आणून देत आणि त्याबद्दल त्यांना फीमध्ये वाटा मिळे. काही मंडळी अगदी मुळाशीच जात. गुन्ह्याबद्दल आरोपीला अटक झाली की अटक करणारा पोलिसच 'तुला जर सुटायचे असेल तर अमुकअमुक वकिलाकडे जा' अशी टीप देई. माझ्या माहितीच्या एका वकिलाचे असे सहाय्यक बसस्थानकवरच सावजे हेरीत बसलेले असत. काहींचा मात्र या मार्गावर विश्वास नसतो आणि ते आपल्या वकिलीतील कौशल्याच्या आधाराने यश मिळवतात. काका तर फौजदारी काम करतच नव्हते. मला फौजदारी कामाची प्राथमिक ओळख तरी करून घेणे आवश्यक होते. काकांचे जुने मित्र नरहरराव तुंगार यांच्याकडे दिवाणीप्रमाणे फौजदारीही काम होते. त्यांच्या घरी काही दिवस जाऊन मी फौजदारी प्रकरणाच्या फायली वाचल्या. रामचंद्रराव देशपांडे आणि थोडे नंतर आलेले मनोहरराव बोर्डे हे दोघेही चळवळीतील काकांचे सहकारी. त्यांच्याकडे फौजदारी काम चांगले होते. न्यायालयात बसून

काही खटल्यांचे काम पाहिले आणि चांगल्या वकिलांनी घेतलेली महत्त्वाच्या साक्षीदारांची उलट तपासणी ऐकली तर फौजदारी वकिलीचे बरेचसे शिक्षण होते. मनुष्यस्वभावाचे चांगले ज्ञान, घटनांची स्वाभाविकता आणि अस्वाभाविकता यातील फरक ओळखण्याची क्षमता असे काही गुण असले तर चांगला फौजदारी वकील होणे कठीण नसते.

फौजदारी वकिलातही गरीबांचे वकील असा एक वर्ग असतो. अब्दुस सलाम नावाचे एक वकील माझ्या चांगल्या स्मरणात आहेत. शाळेतील मुले वापरतात तशा एका चिमट्याच्या पॅडला तीन- चार कोरे कागद आणि वकीलपत्रांचे एक- दोन फॉर्म एवढाच सरंजाम घेऊन ते कोर्टात येत. बाररूममध्ये ते कधी आल्याचे- बसल्याचे मी पाहिलेच नाही. त्यांचा मुक्काम कायम कोर्टाच्या समोर मोकळ्या जागेत असलेल्या झाडाच्या पारावर अगर कोपऱ्यातल्या उपहारगृहात असे. कपडे काहीसे अस्वच्छ आणि अजीबात इस्त्री नसलेले असत. टायसुद्धा तशीच. ज्यांना फारशी फी देणे परवडत नाही अशा गोरगरिबांचे ते रक्षणकर्ते असत. फारशा मोठ्या केसेस त्यांच्याकडे येतच नसत. दारूबंदी, किरकोळ मारामाऱ्या, पोटगी अशीच प्रकरणे ते चालवत. कोणत्याही केसमध्ये उच्च न्यायालयाचा एखादा निवाडा त्यांनी दाखवल्याचे मी पाहिले नाही. दुर्दैवाने ते व्यसनाच्या फेऱ्यात अडकलेले होते. माळीवेशीच्या अलीकडे तेव्हा शिंदीखाना होता. रोज संध्याकाळी कोर्ट संपले की सलामसाहेब तेथे हजर असत. त्यांचे गणगोतही त्याच आधाराने जमत असावे.

एकदा सलाम खूप आजारी आहेत असे कळाल्यामुळे आम्ही काही तरुण वकील बशीरगंजातल्या त्यांच्या घरी गेलो. एका कॉटवर सलाम निजलेले होते. त्यांना प्लॅस्टर करण्यात आल्यामुळे त्यांना अंथरुणावरून हालता येत नव्हते. शेजारी ठेवलेल्या रेडिओवर एक शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम चालू होता. सलाम  तल्लीनतेने ऐकत होते. सलाम यांना शास्त्रीय संगीताची नुसती गोडीच नव्हे तर चांगली माहिती असलेली पाहून आम्ही थक्क झालो. आमच्या मनातल्या त्यांच्या प्रतिमेशी हे विसंगत होते. आम्हाला रोज दिसणाऱ्या सलामांच्यापेक्षा अगदीच वेगळ्या कलाविष्कारात रमणाऱ्या एका सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाची आम्हाला नव्याने ओळख होत होती. सलाम यांनी काही रागांच्या प्रकृतीधर्मातील फरकही समजावून सांगितला. त्यांनी चहा मागवला. घरात चहा करायला कोणीच नव्हते. आपल्या मुलाला त्यांनी चहा आणायला हॉटेलमध्ये पाठवले. मुलगा किटली आणि कपबशा घेऊन आला आणि नंतर आमच्या लक्षात आले की तो कोर्टासमोरच्या एका हॉटेलमध्ये नोकर म्हणून काम करताना आम्ही त्याला पाहिले होते.

काही वेळा माणसाच्या स्वभावाचे कंगोरे विनाकारण न्यायालयीन प्रकरणे निर्माण करतात. माधवराव वाडगावकर हे बीडचे पहिले अॅडव्होकेट. माझ्या वडलांनी काही दिवस त्यांच्याकडे ज्युनियर म्हणून काम केले होते. माधवरावांचे एक स्नेही त्यांना भेटायला नेहमी येत. सहज गप्पांच्या ओघात त्यांनी सांगितले की ‘मला तीर्थयात्रा करावयाच्या आहेत आणि मुलगा मला नको म्हणतो, जाऊ देत नाही.’ वकीलसाहेबांनी लगेच दावा तयार केला. मिळवत्या मुलाने बापाला तीर्थयात्रेसाठी पैसे देणे ही त्याची जबाबदारी आहे, असे म्हणणे दाव्यात मांडण्यात आले होते.  मुलगा जवळच्या एका शहरात वैद्यकीय व्यवसाय करीत होता. प्रॅक्टीस चांगली होती आणि मनानेही चांगला होता. त्याला समन्स मिळताच तो धावत आला. त्याने वडलांच्या वकिलाच्या मुलालाच वकीलपत्र दिले. वकिलांनी विचारले ‘काय कैफियत द्यावयाची?’ त्याने उत्तर दिले ‘वादीचे सगळे म्हणणे मान्य आहे. त्यांनी  दोनशे रुपये मागितले आहेत, त्यांना पाचशे देतो असे लिहा व आजच कोर्टात ते जमा करा. त्यांना आणखी काही पैसे लागले तर मी ते ताबडतोब द्यावयास तयार आहे. मी यात्रेला जाऊ नका हे त्यांच्या प्रकृतीसाठी म्हणत होतो, पैशासाठी नाही.’ प्रकरण दहा मिनिटांत संपले. मुलगा आपल्या मोटारीत वडलांना घेऊन गेला. प्रकृतीची तपासणी केली आणि त्यांना यात्रेला पाठवून दिले.

वकिली व्यवसायात मनुष्यस्वभावाचे विविध नमुने पाहावयास मिळतात. माजलगाव तालुक्यातला एक पक्षकार होता. नाव सगुणाजी किंवा असे काही असावे. गृहस्थ ब्राह्मण असला तरी चार- दोन वर्षांत

त्याला किंवा अंगावरच्या कपड्यांना साबणाचा स्पर्श झालेला नसावा. कळकट अवस्थेत राहणारे हे गृहस्थ सांपत्तिक स्थिती बऱ्यापैकी असूनही फारच कंजुष होते. संध्याकाळी मुक्कामाला बीडला येत आणि मला द्यावयाची फी आणली आहे; पण उद्या सकाळी देतो असे सांगत. रात्रभर आमच्याच व्हरांड्यात झोपत. जर आणले आहेत तर ते पैसे रात्रीच मला देण्याऐवजी सकाळी का हा माझ्यासाठी कुतुहलाचा विषय असे. दोन वेळा असे झाल्यावर त्याबद्दल मी त्यांना विचारले तर त्यांनी दिलेले उत्तर गंमतीचे होते. 'रात्रभर पैसे जवळ असले म्हणजे जरा ऊब वाटते' असे त्यांनी सांगितले. त्यांच्या गावाहून बीडला येण्याला सरळ बस नव्हती. बस बदलून यावे लागे. गावाकडून मधल्या रस्त्याने माजलगावला पायी गेले तेथून बसने आले तर दीड रुपया वाचे. ते मधल्या वाटेने चार कोस चालून नंतर बस धरून पैसे वाचवत. कुणी तरी पाळत ठेवली आणि एकदा आडवाटेने येत असताना त्यांना बडवून सगळे पैसे काढून घेतले. दीड रुपया वाचला पण दीडदोनशे रुपये गेले. शिवाय मार बसला तो वेगळा.

वकिलांनी कसे वागावे याबद्दलचे काकांचे काही दंडक मला उपयोगी पडले. पक्षकाराला मिळण्यासाठी न्यायालयात जमा झालेले पैसे वकिलाला त्याच्यातर्फे काढता येतात किंवा पक्षकाराला बोलावून त्याची न्यायालयात ओळख पटवून त्याला प्रत्यक्ष देवविता येतात. पक्षकाराचे पैसे आपण कधीही उचलू नयेत असा काकांनी नियम पाळला होता व मलाही सांगितला होता. आपण पैसे उचलले याची शासकीय रजिस्टरात नोंद असते. त्यावर आपली सही असते. मात्र आपण पक्षकाराला पैसे दिले आणि त्याची पावती घेतली तरी ती गहाळ होऊ शकते. वकील हा पक्षकाराचा विश्वस्त म्हणून पैसे उचलत असल्यामुळे विश्वस्ताकडून रक्कम परत मिळवण्यास कायद्याने मुदत ठरवलेली नाही. पैसे वकिलाने उचलले तर त्याला त्यातील काही वाटाही मिळू शकतो; परंतु हा मोह पूर्णपणे बाजूला सारावा व पैसे उचलू नयेत असा त्यांनी नियम घालून दिला होता. पोटगीचे पैसे, स्थावर मालमत्तेच्या ताब्याबद्दलचा वाद असल्यामुळे सरकारी लावणी झालेल्या जमिनीचे खंडाचे पैसे, भूसंपादनाचा मिळणारा मोबदला असे अनेक प्रकारचे पैसे पक्षकारासाठी कोर्टात जमा होत असतात. हे पैसे आम्ही कधीही उचलले नाहीत, फक्त पक्षकाराची ओळख सांगितली.

या आमच्या नियमामुळे माझे एक ज्येष्ठ स्नेही मला व्यावसायिक क्षेत्रात दुरावले. एका तालुक्याच्या गावी ते वकिली करीत. एका प्रकरणातील भूसंपादनाचा बराच मोठा मोबदला अनेक पक्षकारांसाठी जमा झाला होता. सर्वांची प्रकरणे मीच बीडला चालवली होती. या वकीलांनी भूसंपादन कार्यालयातील प्राथमिक काम पाहिले होते व न्यायालयात मला मदत केली. त्यांनी मला निरोप केला की ही रक्कम मी उचलावी व त्यांच्याकडे पाठवावी. आमच्या पद्धतीनुसार 'अशी रक्कम मी उचलणार नाही, पक्षकारांना बीडला पाठवा म्हणजे मी ओळख टाकून पैसे त्यांना देववितो' असे मी कळवले. सदर वकील यावर खूपच नाराज झाले. 'माझ्यावर विश्वास नाही काय?' असा प्रश्नही त्यांनी नंतर मला विचारला. प्रश्न त्यांच्या माझ्या विश्वासाचा नव्हता. योग्य पद्धतीचा होता. त्यांनी त्यानंतर माझ्याकडे काम पाठवणे बंद केले; पण मला त्याबद्दल खंत वाटली नाही. काकांना माझा निर्णय अर्थातच योग्य वाटला होता.

पक्षकाराचे पैसे सरळ त्याच्या हातात जाऊ देण्याऐवजी आपल्यामार्फत जावेत असे वाटण्यात फक्त वकीलच दोषी असतात असे नाही. काही चालाख पक्षकार वकिलांना फसवण्याचा प्रयत्न करतात. प्रकरण संपेपर्यंत 'वकीलसाहेब, सरकारी पैसे आल्याबरोबर तुम्हाला भरघोस फी देऊ' अशी आश्वासने देतात, खर्चही वकिलालाच करावयास लावतात. निकाल लागल्यानंतर पैसे कोर्टात जमा झाल्यावर दुसराच वकील बरोबर घेऊन त्याला अगदीच नाममात्र फी देऊन आपली ओळख पटवून परस्पर पैसे घेऊन जातात व पुन्हा मूळ वकिलाला भेटतही नाहीत. मात्र अशा पक्षकारांची संख्या फार थोडी असते. वकील आणि पक्षकार यांच्यातील संबंधात निर्माण झालेल्या अनिष्ट प्रकारांना दोघेही जबाबदार असतात. हल्ली बहुतेक न्यायाधीश अशा रकमा दिल्या जात असताना पक्षकारांना समक्ष हजर ठेवण्याचा आग्रह धरतात.

मी बीडला वकिलीला आलो त्यावेळी साहाय्यक जिल्हा न्यायाधीश म्हणून जे.जी. दांडेकर काम

करीत होते. त्यांच्या न्यायालयात वैद्य आणि काका यांच्यात एक दिवाणी अपील चालू होते. मी आत जाऊन वडलांच्या मागच्या खुर्चीवर बसलो. काकांचा युक्तिवाद चालत असताना दांडेकरांचे लक्ष माझ्याकडे गेले. त्यांनी विचारले, 'हे कोण आहेत? काकांनी माझी ओळख करून दिली. मी वकील झालो आहे हे कळताच दांडेकरांनी प्रकरणाची सुनावणी थांबवली आणि 'ही केस मी परवा दिवशी घेतो; पण आता तुम्ही चालवावयाऐवजी मुलाला चालवू द्या' असे काकांना सांगितले. काकांना तर तो आनंदाचाच भाग होता. एखादे प्रकरण न्यायालयात प्रविष्ट असताना जर मालमत्तेचे हस्तांतरण झाले तर त्याचा काय परिणाम आहे असा प्रश्न त्या अपिलात होता. एखादा वाद न्यायप्रविष्ट असल्याबद्दल दस्ताऐवजांची नोंदणी करणाऱ्या निबंधकाकडे त्याची नोंदणी करणे आवश्यक आहे का असाही त्यात मुद्दा होता. काकांनी मला कायदा अगोदर पाहावयास लावला आणि नंतर तो समजावूनही सांगितला. काकांचे मार्गदर्शन हे फक्त तात्कालिक उपयोगाचे नसे, त्याने दृष्टिकोन तयार होई. कायद्याचा अर्थ लावण्याच्या बाबतीत उपस्थित झालेला प्रश्न एकाकी नसतो, तसेच त्याला अनेक पैलू असू शकतात. सर्व बाजूंनी विचार करून त्याचे उत्तर निश्चित करावे लागते, हे त्यांच्यामुळेच मी शिकलो. न्यायालयीन निवाडे कसे वाचावेत, निवाडे छापणाऱ्या नियतकालिकाच्या संपादकाने त्यातील महत्त्वाचा भाग म्हणून निवडलेला मुद्दा कसा फसवा असू शकतो व निकालाचा खरा गाभा वेगळाच असू शकतो, याचीही उदाहरणे त्यांनी दाखवली. एखादे पुस्तक त्यांनी मला काढायला सांगितले तर ते पुस्तक कपाटातून मी काढेपर्यंत त्याचा पृष्ठ क्रमांक व पाहावयाचा मजकूर पानावर साधारण कोणत्या ठिकाणी आहे हेही ते सांगू लागत. कायद्यातील प्रश्नांचा शोध स्वत: करणे महत्त्वाचे आहे हे त्यांनी माझ्या मनावर बिंबवले. जे पाहून सापडेल, वाचून कळेल ते मी शोधले पाहिजे, नंतरच त्यांना शंका विचाराव्यात अशी सवय त्यांनी आग्रहाने लावली. नंतर दांडेकरांच्या कोर्टात आठवड्यातून निदान एक- दोन अपीले तरी मी चालवत असे. 'निकाल काय लागला याची चिंता करू नकोस, तू तुझी बाजू पूर्ण अभ्यासाने व व्यवस्थित मांडली की नाही हे महत्त्वाचे', असे काका सांगत. दांडेकरांना काकांच्याबद्दल तर आदर होताच, माझ्याहीवर त्यांचा लोभ जडला. दांडेकर एक सरळमार्गी, सत्प्रवृत्त न्यायाधीश होते. सत्यशोधनासाठी न्यायालयाला वकिलाने परिश्रमपूर्वक केलेली मदत त्यांना आवडे. माझा पहिला मोठा फौजदारी खटला मी त्यांच्यासमोरच चालविला.

एके दिवशी संध्याकाळी काकांच्या आजोळचे- केज तालुक्यातल्या सोनवळ्याचे चार- पाच लोक घरी आले. गावच्या गुरवाच्या एका मुलावर खुनाचा खटला झाला होता. त्यात काकांनी वकीलपत्र घ्यावे व गुरवाचा बचाव करावा अशी त्यांची इच्छा होती. मी कधीही फौजदारी काम केलेले नाही, तुम्ही दुसऱ्या वकिलाकडे जा असे काकांनी त्यांना सांगितले. गावातल्या दोन-तीन प्रसिद्ध वकिलांची नावे घेऊन 'त्या सगळ्यांकडे आम्ही जाऊन आलो; पण त्यातले कुणीही केस घ्यायला तयार नाहीत' असे त्यांनी काकांना सांगितले. प्रत्यक्ष पाहणारे साक्षीदार म्हणून सात- आठ मुलांच्या जबान्या त्या खटल्यात होत्या व त्यांच्यावर कोणीही अविश्वास दाखवला नसता. यामुळे आरोपी सुटण्याची शक्यता नाही असे त्या वकिलांना वाटले असण्याची शक्यता होती. शिवाय या केसमध्ये जास्त पैसे मिळण्याची शक्यता नव्हती हे ही उघड होते. मी शांतपणे बसून होतो. 'नाना हल्ली काय करतात' असा प्रश्न त्यांच्यापैकी एकाने काकांना विचारला. तो वकील होऊन आला आहे, असे उत्तर मिळताच मग त्यांनाच ही केस चालवू द्या असा सोनवळकरांनी आग्रह करण्यास सुरुवात केली. काका मला आतल्या हॉलमध्ये घेऊन गेले. ''या खटल्यात सात- आठ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत, खून सिद्ध झाल्याचे गृहित धरले तर फाशीही होऊ शकेल. तो खून नव्हता असे ठरवले गेले तर तुझ्या नावावर फार मोठे यश नोंदविले जाईल. हा एक जुगार आहे. तुझ्यासाठी एक संधीही आहे. तू निर्णय घ्यावयाचा आहेस'' असे काकांनी मला सांगितले. मी रात्रभर कागदपत्र वाचून काढले व रात्री मुक्कामाला आमच्याकडेच असलेल्या सोनवळ्याच्या त्या लोकांना 'मी केस घेतो' असे सकाळी उत्तर दिले.

चौकशी करताना पोलिसांनी घेतलेल्या जबान्यांच्या आरोपीला दिलेल्या प्रती त्यांनी बरोबर आणल्या

होत्या. त्यावरून घडलेली घटना समजत होती. गावाबाहेर असलेल्या मारुतीच्या देवळाच्या पारावर मुले खेळत होती. त्यातल्या दहा- अकरा वर्षांच्या एका मुलाला गुरवाच्या २०-२१ वर्षांच्या मुलाने दोन्ही कानाना धरून उचलले आणि तसेच सरळ पायावर आदळले. त्यानंतर तो मुलगा घरी चालत गेला. काही वेळाने त्याच्या नाकातोंडातून पांढरा द्रव बाहेर पडू लागला व दोन तासानंतर तो मेला. या मुलाचे आणि गुरवाच्या मुलाचे कोणतेही शत्रुत्व नव्हते. गुन्ह्याला काही तरी हेतू चिकटवणे आवश्यक आहे म्हणून पोलिसांनी एक जबानी घेतली होती व त्यात सहा महिन्यांपूर्वी चिंचा पाडण्यावरून या दोघांचे भांडण झाले असे लिहून घेतले होते. सकृतदर्शनीच हा खुनाचा प्रकार नव्हता. पण असे का घडले हे शोधणे जरूर होते.

गावकऱ्यांना अधिक माहिती विचारली तेव्हा आरोपीला लहानपणापासून अपस्माराचा- फेंफरे येण्याचा विकार आहे व त्यामुळे तो अधूनमधून बेशुद्ध पडतो असे कळाले. न्यायवैद्यक शास्त्राच्या टेलर यांच्या पुस्तकात अपस्माराच्या रोग्याच्या काही हकिगती मला सापडल्या. इंग्लंडमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीला अपस्माराच्या दोन झटक्यांच्या दरम्यान काय घडले तेच आठवत नसे. तो अमेरिकेत गेला तेथे सतरा वर्षे राहिला, नंतर पुन्हा इंग्लंडला परत आला. अमेरिकेत त्याने लग्न केले होते व मुलेबाळेही झाली होती. इंग्लंडला परत आल्यावर त्याला यातले काहीच आठवत नव्हते. अपस्माराच्या विकाराचे हे परिणाम अभ्यासून मी खटल्यातील बचाव निश्चित केला.

महत्त्वाचे साक्षीदार आठ- दहा वर्षांची मुले होती. त्यांनी खोटे बोलण्याचे काहीच कारण नव्हते. त्यांना मी उलटतपासणीत तुमच्याशी कसे वागत होता, त्याच्याबरोबर खेळत होता का असे विचारले. अपेक्षेप्रमाणे उत्तर आले की, 'त्याला घुरे येते. तो दिसला की आम्ही घाबरून पळून जात होतो.' सरकारी वकील नेहमीच्या पठडीतील होते. त्यांना वाटले पोलिसांसमोरील जबानी जशीच्या तशी सांगितली तर खून कसा सिद्ध होणार? म्हणून त्यांनी मुलांना दटावून काहींना असे सांगण्यास भाग पाडले की आरोपीने मयत मुलाला उलटे केले आणि डोक्यावर खाली आपटले. ही दुरुस्ती म्हणजे धडधडीत असत्य होते. वैद्यकीय अधिकारी साक्षीला आले तेव्हा मी त्यांना विचारले की डोक्यावर आपटले तर थोडीतरी जखम डोक्याच्या कोणत्यातरी भागाला व्हावयास हवी की नाही? त्यांनी होकारार्थी उत्तर दिले आणि सरकारी वकिलांनी चढवलेला असत्याचा मुलामा गळून पडला.

आरोपीतर्फे बचावाचे साक्षीदार म्हणून त्यावेळी परभणीत सिव्हिल सर्जन असलेले डॉ. अकबर अली यांना मी बोलावले. डॉ. अकबर अली हे मानसिक विकारांचे तज्ज्ञ मानले जात. त्यांनी आपल्या जबानीत अपस्माराच्या रोग्याला आलेल्या दोन झटक्यांच्यामधील कालखंडात तो काय करतो हे त्याला कळतही नाही व स्मरणातही राहत नाही असे सांगितले व अनेक उदाहरणे दिली. पोलिसांच्या समोर साक्षीदारांनी सांगितलेली मूळ घटना मी कोठेही अमान्य केली नव्हती. लहान मुलांना 'हरीण दाखवणे' किंवा 'सूर्याची पिल्ले दाखवणे' या नावाने ओळखला जाणारा एक अघोरी प्रकार पूर्वी मोठी माणसे करीत. मुलाच्या कानाला धरून वर उचलायचे आणि तसेच खाली आदळावयाचे हा तो खेळ असे. या खेळातसुद्धा जी इजा होऊ शके तीच या खटल्यातील मुलाला झाली होती. मेंदू आणि पाठीचा मणका यांना जोडणारा हाडाचा वर्तुळाकार भाग (फोरॅमिन मॅग्नम) अशा झटक्याने तुटतो व मेंदूतील द्रव नाकातोंडून बाहेर येऊन माणसाचा मृत्यू घडतो. असे होऊ शकते असे डॉ. अकबर अलींनी सांगितले. एखादा माणूस त्याच्याच पायावर सरळ जोरात आदळला तर त्याचा धक्का मेंदूपर्यंत जाऊन अशी इजा होऊ शकते हेही त्याने मान्य केले. फिर्यादी पक्षाच्या पुराव्याला समांतर जात फक्त आरोपीच्या बचावाला उपयुक्त गोष्टी मी सिद्ध करून घेतल्या होत्या. न्यायाधीश दांडेकरांनी माझा बचाव मान्य केला आणि आरोपीला ३०२ कलमाखालील आरोपातून मुक्त केले. त्याने साधारण इजा केल्याबद्दल त्याला सात दिवसांची साधी कैद सुनावली. परंतु त्याची मानसिक स्थिती लक्षात घेता तीही स्थगित करून वैद्यकीय उपचारासाठी त्याला रवाना केले. दांडेकरांची बीडहून बदली झाली त्यावेळी निरोप समारंभात उत्तर देणारे भाषण करताना त्यांनी या खटल्याचा मुद्दाम उल्लेख केला व मी केलेल्या परिश्रमाबद्दल जाहीरपणे

माझे कौतुक केले.

एका ज्येष्ठ वकिलांनी आपल्या स्वत:च्या प्रकरणातील एक अपील दांडेकरांच्या समोर चालवण्यासाठी मला दिले होते. शेजाऱ्याने आपल्या जमिनीवर अतिक्रमण केले आहे अशी त्यांची बाजू होती. कनिष्ठ न्यायालयात निकाल विरुद्ध लागला होता. अपीलाची सुनावणी सुरू होताच दोनचार मिनिटांत मला दांडेकरांनी प्रश्न विचारला की जमिनीची मोजणी करून घेऊन अतिक्रमण दाखवणारा नकाशा तुम्ही दाव्यासोबत दाखल केला आहे काय? असा नकाशा दाखल केलेलाच नव्हता त्यामुळे मी सरळ नकारार्थी उत्तर दिले. कागदपत्रांच्याबद्दल लपवाछपवी करणे अगर न्यायालयाच्या प्रश्नाला सरळ उत्तर देण्याचे टाळणे मला शक्य नव्हते. मागेच बसलेल्या, ज्यांचे हे प्रकरण होते त्या, वकीलसाहेबांना मात्र माझे हे उत्तर आवडले नाही. त्यांनी उभा राहून काही बोलण्याचा प्रयत्न केला. तेव्हा दांडेकरांनी त्यांनाच विवेचन करू द्या असे मला सांगितले व मला खाली बसण्याचा इशारा केला. ''अतिक्रमित भागाचा नकाशा दाखल केला आहे काय?'' हाच प्रश्न न्यायालयाने वकीलसाहेबांना तीन- चार वेळा शांतपणे विचारला; पण प्रत्येकवेळी मूळ प्रश्न डावलून 'सातबाराचा उतारा दाखल केला आहे', 'साक्षीदारांनी अतिक्रमण केल्याचे सांगितले आहे', 'पाहणीपत्रकात क्षेत्रफळ लिहिले आहे' वगैरे उत्तरे त्यांनी द्यावयास प्रारंभ केला. सुमारे १५ मिनिटे वकीलसाहेबांकडून सरळ उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करूनही अपयश आल्यावर न्यायाधीशांनी मनाशी निर्णय घेतला की यांचे विवेचन ऐकून घेऊ आणि निर्णय देऊ. अर्धा तास शांतपणे दांडेकर विवेचन ऐकत होते आणि नंतर त्यांनी नाईलाजाने अपील नामंजूर करणारा निकाल दिला. जर वकीलसाहेबांनी तयारी दर्शवली असती तर अपील तहकूब करून जमिनीची मोजणी कोर्ट कमिशनरमार्फत करवून अतिक्रमण आढळले तर वकीलसाहेबांना न्याय मिळू शकला असता. सेवानिवृत्तीनंतर दांडेकर औरंगाबादला स्थायिक झाले. मुलगा अमेरिकेत एका मोठ्या कंपनीत उच्चपदावर होता. आपल्या आई- वडलांनी आपले घर पाहण्यासाठी अमेरिकेत यावे अशी त्याची इच्छा होती. मी तुझ्या पैशाने येणार नाही. माझे पैसे जमले म्हणजेच मी तिकडे येईन, असे दांडेकरांचे उत्तर होते.

दांडेकर सहायक जिल्हा न्यायाधीश असताना जिल्हा न्यायाधीशपदी एस.जी. ओक होते. ओक एक प्रामाणिक पण कडवटपणाकडे कधी कधी झुकणाऱ्या काटेकोर स्वभावाचे होते. त्यांच्या कोर्टहॉलच्या अगदी समोर असलेल्या उघड्या गॅरेजमध्ये त्यांची गाडी असे. गॅरेजच्या बाजूला वकीलसंघाची इमारत होती. साहजिकच बरेच वकील बाहेर उभे असले म्हणजे कोणी तरी गाडीला खेटून उभे राही. आपल्या गाडीला कोणी टेकून उभे आहे काय याकडे ओकांचे सतत लक्ष असे. मधूनमधून ते त्या वकिलांना बाजूला सरकण्याचा निरोप शिपायामार्फत पाठवीत. कायद्याच्या तरतुदीसंबंधी आपल्या कल्पनेपेक्षा वेगळे कोणी सांगितले तर ते स्वीकारायला त्यांना अवघड जाई. शेतकऱ्यांच्या ऋणमुक्तीसाठी जे कायदे झाले त्यात खरेदीखत लिहून घेतले असले तरी वस्तुत: ते गहाणखत आहे व तारण म्हणून लिहून दिले आहे असा पुरावा देता येत असे. लेखी दस्तावेजातील मजकुराच्याविरुद्ध तोंडी साक्ष चालणार नाही या भारतीय पुराव्याच्या कायद्यातील तरतुदींना हा अपवाद आहे. काकांनी एकदा विवेचन करताना या विशेष तरतुदींचा आधार घेतला तर साहेब रागावले. असे काही सिद्ध करता येते हेच ते मान्य करेनात. प्रकरणातील तरतूद हैदराबाद ऋणमुक्ती कायद्यातील असली तरी मुंबई राज्यात जवळपास शंभर वर्षांपूर्वी झालेल्या कायद्यात तशीच तरतूद होती व त्यावर न्यायालयीन निवाडेही उपलब्ध होते. काकांनी ते निवाडे आणून दाखल्यावर कायद्याची स्थिती मान्य करणे न्यायाधीशांना भाग पडले; मात्र त्यांनी नंतर अवघ्या चार दोन ओळीत पुराव्याचा उल्लेख करून पुरेसा पुरावा नाही असे ठरवून ऋणकोचे अपील नामंजूर केले. आपल्या समजुतीपेक्षा कायदा वेगळा आहे असे कोणा वकिलाने लक्षात आणून दिले तर मोकळ्या मनाने ते न्यायाधीशाने स्वीकारणे आवश्यक असते; पण नेहमी तसे घडतेच असे नाही.

ओक स्वत: स्वच्छ होते पण इतर लोकही तसेच असू शकतात यावर मात्र त्यांचा विश्वास नसे. काकांच्या एका जुन्या पक्षकाराला लाच देण्याच्या आरोपाखाली खोटा खटला भरून पोलिसांनी गुंतविले होते. पक्षकाराच्या आग्रहामुळे काकांनी तो खटला चालवला होता. त्या खटल्यात निकालाच्या दिवशी

काकांनी एकंदर रागरंग बघून जामीनाचा अर्ज तयार ठेवला होता. फौजदारी प्रकरणात वकील निकालाच्यावेळी जामीनाचा अर्ज तयारच ठेवतात म्हणजे निकाल लागल्याबरोबर तो देता येतो. काहीवेळा तर अपीलही कच्चे लिहून ठेवावे लागते. आरोपीला शिक्षा झाली म्हणजे conviction slip वर बोटांचे ठसे घ्यावे लागतात. शिक्षा देण्याचा निकाल लिहिला म्हणजे न्यायाधीश शिरस्तेदाराला ठसे घेण्याला कित्येकवेळा अगोदरच सूचना देतात व नंतर बाहेर येऊन निकाल सांगतात. या खटल्यात आरोपीचे ठसेही घेण्यात आले तेव्हा आरोपीला शिक्षा होणार हे लक्षात आलेच होते. ओकसाहेबांनी चेंबरच्या बाहेर येऊन निकाल सांगितल्याबरोबर काकांनी लगेच जामीनाचा अर्ज हजर केला. शिक्षेचे स्वरूप पाहता जामीन तर द्यावाच लागणार होता; पण ओकांना शंका आली की निकाल अगोदर फुटला आहे. विमलचंद पोरवाल नावाचा एक सज्जन टंकलेखक त्यांच्याकडे होता. त्याचाच त्यांना संशय आला. त्यांनी बरीच चौकशी केली आणि नंतर आपली समजूत चुकीची होती हे त्यांना कळाले.

ओकांचा दुसराही एक अनुभव सांगितला पाहिजे. एका बाईच्या मालकीच्या जमिनीचे दुसरी एक बाई नोंदणी निबंधकाच्या कार्यालयात नेऊन खोटी ओळख पटवून बनावट खरेदीखत करून घेतले असा आरोप असलेला एक खटला होता. निबंधकाच्या समोर दस्तावेज लिहून देणारा आपली ओळख नावगाव सांगून देतो व समोरील व्यक्ती तीच असल्याबद्दल दोन साक्षीदार ओळख पटवतात. गंगाबाई म्हणून शेवंताबाईला तेथे उभे करण्यात आले व हीच गंगाबाई आहे अशी ओळख साक्षीदारानेदिली असे फिर्यादीपक्षाचे म्हणणे. योगायोग असा की निबंधकाने आपल्या सरतपासणीत फक्त सर्वनामे वापरली. 'या बाईना तुम्ही ओळखता का' असे मी आरोपींना विचारले. 'होय, आम्ही या बाईना ओळखतो' असे त्यांनी उत्तर दिले. एवढेच सरतपासणीत आले होते. या जबानीत आरोपीविरुद्ध काहीच नव्हते.

अशा साक्षीला कोणतीही उलटतपासणी करण्याची गरज नव्हती; परंतु आरोपींच्या वकिलांना असे वाटले की आपण काहीच विचारले नाही तर मग आपला उपयोग काय? ओकांनी चक्क हात जोडले आणि वकीलसाहेबांना विनंती केली की तुमच्याविरुद्ध काही नाही, कृपा करून काही प्रश्न विचारू नका.' न्यायाधीशांनी वारंवार केलेल्या या कळकळीच्या विनंतीला वकीलसाहेबांनी धूप घातली नाही व प्रश्न विचारण्याचा आग्रह धरला. ओकांचा नाईलाज झाला आणि त्यांनी उलटतपासणी होऊ दिली. आरोपीच्या वकिलांनी साक्षीदाराला जागे करणारा प्रश्न विचारला 'तुम्ही या बाई गंगाबाई आहेत हे तुम्हाला माहीत आहे का असा प्रश्न आरोपीला तुम्ही केला नाही.' साक्षीदार रजिस्ट्रार होता. त्याला अनुभवही होता. अनवधानाने आपल्याकडून घडलेली चूक दुरुस्त करण्याची मिळालेली संधी तो कशी सोडणार? ''मी आरोपीला विचारले, 'ही गंगाबाई आहे काय? त्यांना तुम्ही ओळखता का?' त्यांनी ही गंगाबाई आहे व मी त्यांना ओळखतो' असे मला उत्तर दिले अशी खुलासेवार माहिती उलटतपासणीत दिली. नाईलाजाने ओकसाहेबांना आरोपींना शिक्षा द्यावी लागली.

स्वभावात काही किरकोळ दोष असले तरी ओक एक हुशार न्यायाधीश होते. त्यांची बदली झाली त्यावेळी त्यांनी अगोदर निरोप समारंभ स्वीकारावयास नकार दिला. बराच आग्रह केल्यानंतर ते वकीलसंघात आले आणि उत्तरादाखलच्या आपल्या भाषणात आपल्या स्वभावामुळे आपण लोकप्रिय होऊ शकलो नाही, याची खंत व्यक्त केली.

ओकांच्या नंतर आलेले नरहर लक्ष्मण रानडे हे जीवनव्यवहाराचे व मनुष्यस्वभावाचे उत्तम ज्ञान असलेले, हसतखेळत कामकाज चालवणारे न्यायाधीश होते. इंग्रजीवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते. हिंदुत्वाकडे थोडा कल असलेल्या पण कोणत्याही राजकीयप्रणालीशी संबंध नसलेल्या रानड्यांच्या घराची आणि ग्रंथालयाची गांधीवधोत्तर दंगलीत जाळपोळ झाली होती.

मालकीची दहा गाढवे असलेल्या एका माणसाला सकृतदर्शनी उपजीविकेचे साधन नसल्याबद्दल अटक करून पोलिसांनी त्यावर प्रतिबंधक कारवाई केली होती. एखाद्याला उपजीविकेचे दृश्य साधन नसेल तर तो गुन्हा करू शकतो, त्यावर नजर ठेवणे गरजेचे आहे असे कायदा मानत होता. पोलिसांच्या या कारवाईविरुद्धचे अपील किशनराव देसाई नावाचे एक जुने वकील चालवत होते. गाढवांची किमत

किती आहे हे सांगून दहा गाढवे म्हणजे मोठी संपत्ती आहे व त्या आधारे एका कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो असा देसाईचा बचाव होता. आपल्या निकालपत्रात रानड्यांनी हल्लीच्या जगात गाढवांची किंमत कशी वाढली आहे हे उपरोधिक भाषेत नमूद केले आणि ते अपील मंजूर केले. वेगाने काम करणे आणि तेही न्यायालयातील वातावरण चैतन्यमय ठेवून हे त्यांचे वैशिठ्य होते. लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली त्यावेळी दोन किंवा तीन रुपयांची लाच घेणाऱ्या वनविभागाच्या किंवा इतर खात्यांच्या शिपायावर खटले होत. असा खटला सुरू झाला की रानडे कोर्टात म्हणायचे ''जरा कोणी मोठा आणा ना. त्याला आत पाठवू. या किरकोळ लोकांच्या काय मागे लागता?''

एखाद्या अपघाताने मातृत्व लादल्या गेलेल्या स्त्रीवर नुकत्याच जन्मलेल्या मुलाची हत्या करण्याचा आरोप असेल किंवा असेच काही किरकोळ प्रकरण असेल तर सरकारतर्फे बचावाचा वकील म्हणून ते माझी नेमणूक करीत. न्यायालयाची वेळ संपताना बोलावून फाईल देत आणि वाचून या व उद्या केस चालवा. उद्याच संपली पाहिजे, असे सांगत. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या अशा खटल्यात सायंकाळी पाचपूर्वी निकालपत्रावर सहीही होई. त्यावेळी सरकारतर्फे वकील असल्यास दररोज ३० रुपये मिळत. ज्यांच्याकडे काम नसे अशांना असे वकीलपत्र आले म्हणजे जेवढे जास्त दिवस केस चालवता येईल तेवढी चालवावी असे वाटे. मी मात्र कधीही केस लांबवण्याचा प्रयत्न करत नव्हतो. त्यामुळे मला अशा केसेस रानडे देत. काही वकिलांना अर्थातच हे बरे वाटले नाही. त्यापैकी एक जण रानड्यांना चेंबरमध्ये भेटला व त्यालाही काम द्यावे अशी त्याने विनंती केली. रानड्यांनी ताबडतोब कबूल केले; पण अट एवढीच घातली की, केस एका दिवसात संपली पाहिजे. असे म्हटल्यावर मग त्याला केस चालवण्यात फारसा रस राहिला नाही.

एकदा एका खाटकाने भररस्त्यावर गाय मारल्यामुळे चिडलेल्या पाच- सहा लोकांनी त्याला बडवले व त्यात त्याचा मृत्यू झाला होता. रानड्यांच्या समोर चालेला हा खटलाही मुद्दाम जिद्दीने तिखटमीठ लावून चालवल्याबद्दल सरकारी वकिलावर रानडे किंचित मनोमन नाराज झाले असावेत. अर्थात त्यांनी आरोपींना द्यावयाची ती योग्य शिक्षा दिलीच. रानड्यांनी न्यायालयात गणपती उत्सव सुरू केला. काही भाषणे आणि  संगीताचे काही कार्यक्रम होऊ लागले.

व्ही.पी. गाडगीळ या नावाचे एक जिल्हा न्यायाधीश बीडला होते. मी लातूरला प्राध्यापक असताना तेथे ते साहाय्यक जिल्हा न्यायाधीश म्हणून काम करीत होते. वागायला अतिशय मनमोकळे, मात्र व्यक्तिगत संबंध आणि न्यायालयीन कर्तव्य यांची कधीही सरमिसळ न होऊ देणारे. गाडगीळबाईही अतिशय आतिथ्यशील. घरी आलेल्या अगदी शिपायालासुद्धा काहीना काही खायला दिल्याशिवाय जाऊ द्यावयाच्या नाहीत. एका वकिलांचे व्यक्तिगत अपील त्यांनी मला चालवावयास दिले होते. वकिलसाहेबांच्या पत्नीच्या नावे एका जमिनीची इसारपावती (साठेखत) करून घेण्यात आली होती. त्याआधारे त्यांचा दावा होता. खालच्या कोर्टाने  इसारपावती नाशाबीत धरून  विरुद्ध निकाल दिला होता. ज्या दिवशी अपीलाची सुनावणी गाडगीळसाहेबांच्या समोर होणार होती त्याच दिवशी सकाळी काही निमित्ताने त्या वकीलसाहेबांनी निवडक मंडळींना आपल्या घरी जेवावयास बोलावले होते. त्यात गाडगीळासह सर्व न्यायाधीशही होते. जेवण आटोपले की ताबडतोब गाडगीळसाहेब न्यायालयात हजर झाले. पहिली केस तीच होती. गाडगीळांनी माझे विवेचन सुरू करण्यासाठी मी उभा राहताच मला सांगितले की, 'तुमच्या अशिलाने करून घेतलेले साठेखत (इसारपावती) बनावट आहे, असे माझे मत झाले आहे. बनावट दस्तावेज करून न्यायालयात उपयोगात आणण्याबद्दल तुमच्या पक्षकारावर खटला भरण्याचा आदेश मी देऊ इच्छितो. केवळ पक्षकार वकीलसाहेबांच्या वयाकडे पाहून मी त्यांना एक संधी देऊ इच्छितो. हे अपील तुम्ही पाच मिनिटांत जर काढून घेत असाल तर मी तशी परवानगी देईन व खटला भरण्याचा आदेश देणार नाही. मात्र जर तुम्ही अपील चालवले तर मात्र मी ते करीनच.' मी लगेच पक्षकार- वकीलसाहेबांना विचारले. त्यांनी संमती दिली व मी अपील परत घेतले. ज्याचे अपील आपल्यासमोर आहे त्याच्या घरी जेवावयास जाण्यास न्यायाधीशांना संकोच वाटला नाही आणि ज्याकडे सुग्रास भोजन तासापूर्वीच घेतले

त्याचा कठोर न्यायनिवाडा करण्यासही त्यांना अडचण वाटली नव्हती. मने स्वच्छ होती व काळही स्वच्छ होता.

गाडगीळांना शास्त्रीय संगीताची चांगली समज होती. त्यांच्या काळात न्यायालयातील गणेशोत्सवात उत्तमोत्तम कार्यक्रम झाले. गाडगीळांच्या पुढाकारानेच वकील संघाची गोवा सहल झाली. काकांच्यासारखे जुन्या पिढीचे अनेक वकील प्रथमच अशा सहलीत सहभागी झाले होते.

पूर्वी सहायक जिल्हा न्यायाधीश ही एक वेगळी श्रेणी होती. त्यावेळी सहायक जिल्हा न्यायाधीशातून जिल्हा न्यायाधीशपदी बढती होत असे. कामाची वाटणी करण्याचा अधिकार जिल्हा न्यायाधीशाला असला तरी तो सर्व बाबतीत सहायक जिल्हा न्यायाधीशाचा वरिष्ठ नसतो. कामाची वाटणी न्याय करणे ही प्रमुखाची जबाबदारी असते. काहीवेळा मनुष्यस्वभाव आड येतात आणि असे होत नाही. अगदी किरकोळ दोन- चारच साक्षीदार असलेल्या सेशन्स केसेस आपल्याकडे ठेवून घ्यायच्या आणि पन्नाससाठ साक्षीदार असलेल्या मोठ्या केसेस साहाय्यकाकडे पाठवून द्यावयाच्या, अपीले वाटताना क्रमाप्रमाणे न वाटता जाडजूड फायली पाठवून द्यायच्या व किरकोळ आपल्याकडे ठेवायच्या असेही काही जण करीत. अशाच एका जिल्हा न्यायाधीशाने तीन- चार किरकोळ सेशन्स केसेस महिन्यात संपवल्या आणि शंभरावर साक्षीदार असलेली केस चालवणाऱ्या अतिरिक्त सत्र न्यायाधीशास ‘तुमची एकच केस अजून का संपली नाही’ असा उद्धट प्रश्नही विचारला. तो ही जशासतसा होता. ‘हातरुमाल धुणे आणि पासोडी धुणे यात फरक आहे’ असे जोरदार उत्तर त्याने दिले. आणखी एक जिल्हा न्यायाधीश माझ्या स्मरणात आहेत. गृहस्थ पापभीरू आणि सज्जन; परंतु भयंकर आळशी. दुपारी कोर्टाच्या वेळेत चेंबरमध्ये दोन-तीन तास तरी झोपत. दुर्दैवाने त्यावेळी तेथे असलेले साहाय्यक जिल्हा न्यायाधीश अतिरिक्त उत्पन्नाचे चाहते होते. त्यांनी मित्राच्या आळशीपणाचा पुरेपूर लाभ उठवला. ज्या केसमध्ये काही लभ्यांश होऊ शकेल त्या फायली ‘‘साहेब, तुम्ही कशाला त्रास घेता, मोठी फाईल आहे, मी पाहून घेतो’’ असे सांगत स्वत:कडे घ्यायच्या असा क्रम त्यांनी चालू केला. अशा प्रकारे अपप्रवृत्तीला आळसाचे साह्य झाले होते.

आर.व्ही. मोडक या नावाचे एक साहाय्यक जिल्हा न्यायाधीश बीडला होते. कामाला उत्तम आणि स्वभावाने सज्जन. मोडकांचा एक दोष असा की त्यांना राग लवकर येई; मात्र आपण रागावलो होतो हेही ते थोड्यावेळाने विसरून जात. त्यांच्या आणखी एका सवयीचा मात्र फार ताप होत असे. त्यांच्या उजवीकडे सरकारी वकील उभा असे तर डावीकडे आम्ही आरोपीचे वकील. ते डावीकडे पाहायचे आणि सरकारी वकिलाला उद्देशून बोलायचे. एकदा त्यांनी असेच तयारी न करण्याबद्दल सरकारी वकिलाला खूप तासले. मात्र हे तासणे आरोपीच्या वकिलाकडे म्हणजे माझ्याकडे पाहून चालले होते. मला त्यांची सवय माहीत होती; पण माझ्या आरोपीला नव्हती. लहानसा चेहरा करून पिंजऱ्यातल्या आरोपीने मला जवळ बोलावले आणि हळूच विचारले ‘साहेब तुमच्यावर आज का बिघडलेत?’

एकदा मोडकांच्या समोरची पाच- सहा अपीले एकामागोमाग एक वेगवेगळ्या कारणाने वाढली. त्या दिवशी करायला कामच उरले नाही. मोडक संतापले. त्यांनी त्यानंतरची (म्हणजे दुसऱ्या दिवशी चालणारी) अपीले मागवली व वकिलांना बोलावण्यास सांगितले. पहिल्याच अपीलात मी आणि वैद्यांचा मुलगा सदानंद वैद्य वकील होतो. आम्ही धावत कोर्टहॉलमध्ये आलो. चालवा म्हटल्यानंतर आम्ही नकार तर देणारच नव्हतो. सदानंदने फक्त विनंती केली की घरी जाऊन पंधरा मिनिटांत फाईल आणतो. मोडकांनी तेवढी मुदत द्यावयासही नकार दिला. इतरांचा राग त्याच्यावर काढला. सरकारी फाईल त्यांनी त्याच्यासमोर टाकली. सदानंदने लगेच ती चाळून विवेचन केले आणि निकाल योगायोगाने त्याच्यासारखा लागला. त्या दिवशी संध्याकाळी गावात एका दुकानात काही खरेदी करीत असताना मोडकसाहेबांची माझी भेट झाली. एक- दोन वाक्ये इतर विषयाबद्दल बोलल्यानंतर ते म्हणाले, ‘अहो, सदानंद वैद्य हल्ली दिसतच नाहीत. या आठवड्यात ते कोर्टात आलेच नाहीत काय?’ मी नम्रपणे त्यांना आठवण दिली की आजच दुपारी काहीच कारण नसताना तुम्ही त्याची बरीच खरडपट्टी काढली आहे. दुपारीच ते वैद्य आणि मला रागावले होते, हेच मुळी त्यांच्या लक्षात नव्हते.

एका जिल्हा न्यायाधीशाचा मुलगा जेथे ते काम करत होते त्याच गावात वकिली करू लागला. वस्तुत: त्याला तरी परगावी वकिलीला पाठवावयाचे होते किंवा आपली बदली तरी करून घ्यावयास हवी होती. पण हे पथ्य पाळले गेले नाही. मुलगा बापासमोर काम करू शकत नव्हता; पण तो इतर न्यायाधीशांच्यासमोर काम करी. त्यांची मात्र पंचाईत झाली. आपण नि:पक्षपाती आहोत हे दाखवण्याची गरज त्यांना निर्माण झाली. ज्या खटल्यात पूर्वी दुसरा वकील आहे त्यातही नंतर आपले वकीलपत्र हे न्यायाधीशपुत्र दाखल करू लागले. परिणाम असा झाला की त्याचे वकीलपत्र ज्या बाजूने आहे त्याच्याविरुद्ध निकाल आपण दिला तरच आपले नि:पक्षपातीपण सिद्ध होईल असे न्यायाधीशांना वाटू लागले. असे करण्याने न्यायालयाचे नि:पक्षपातीपण लोकमानसावर ठसले असते; पण काही पक्षकारावर विनाकारण अन्याय झाला असता. त्याच जिल्ह्यातल्या एका तालुक्याच्या गावी या मुलाचे वकीलपत्र दाखल झाल्यामुळे गुन्हा जामीनपात्र असूनही न्यायाधीशाने जामीनअर्ज फेटाळून लावला. असे करता येत नाही हे त्याला माहीत होते; पण तरीही त्याने असा हुकूम दिला. सत्र न्यायालयात जाऊन आरोपींना जामीन मिळवावा लागला.

गेवराई गावतील एका जमिनीबद्दल तेथील दोन सामर्थ्यवान कुटुंबामध्ये वाद होता. त्या जमिनीतील प्लॉटस् काही वकील व गावातील प्रतिष्ठितांनी विकत घेतले होते. फौजदारी प्रकरण या जमिनीबद्दल दाखल झाले व प्लॉट विकत घेणाऱ्यांना आरोपी करण्यात आले. या आरोपीत माझे काही वकील स्नेहीही होते. फिर्यादीत शस्त्रे घेऊन जमिनीवर ताबा करण्याचा प्रयत्न केला व धाक दाखवला असे अनेक आरोप करण्यात आले होते. शुक्रवारी दुपारी त्या सर्वांना अटक करण्यात आली व बीडला आणण्यात आले. सायंकाळी कनिष्ठ न्यायाधीशाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला. आता त्यांच्या जामीनाचा अर्ज सत्र न्यायाधीशाकडे करावा लागणार होता. आरोपीपैकी माझ्या एका वकीलमित्राच्या मुलीचे लग्न दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता गेवराईला होणार होते. त्याला जामीन मिळवून देणे आवश्यक होते. रात्री नऊ वाजता त्याच्या वतीने जामीनाचा अर्ज अतिरिक्त सत्रन्यायाधीशांच्या घरी जाऊन मी केला. 'तुम्ही सरकारी वकिलांना घेऊन या म्हणजे मी अर्जावर हुकूम करतो' असे त्यांनी मला सांगितले. मी सरकारी वकिलांना बोलावण्यासाठी गेलो. सरकारी वकिलांचा स्वभाव आणि पद्धती मला माहीत होती. त्यामुळे ते येणार नाहीत हेही मला माहीत होते. पण बोलावणे जरूर होते. त्यांनी पोलिसांच्याकडून सूचना आल्या म्हणजे मग मी येतो असे नेहमीचे उत्तर दिले. इकडे न्यायाधीशांनी आता मी झोपलो आहे असे आलेल्या माणसांना सांग असे शिपायाला सांगून दरवाजे बंद करून घेतले. अतिरिक्त सत्र न्यायाधीशांचे हे वर्तन हा माझ्यासाठी एक नेहमी लक्षात राहणारा अनुभव होता. मी त्यानंतर जिल्हा न्यायाधीश ए.डी. तातेड यांच्या घरी जाऊन त्यांची झोपमोड केली. तातेड यांना काय घडले हे सांगितल्यानंतर त्यांनी लगेच तीन दिवसासाठी त्या आरोपीचा तात्पुरता जामीन मंजूर केला. त्यावेळी पहाटेचा एक वाजला होता. जामीनाचा हुकूम दाखवल्यानंतर सकाळी आठ वाजता बीडच्या तुरुंगातून त्या आरोपी वकिलाची मुक्तता झाली आणि त्याला मुलीचे लग्न वेळेवर लावता आले. व्यक्तीजीवनातील एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगी न्यायाधीशाच्या दृष्टिकोनामुळे कधी असे चांगले घडू शकते. आरोपी हा क्षणभर गुन्हेगार मानला तरी तोही माणूस असतो, त्याच्याही कुटुंबात लग्नकार्यासारखे आनंदाचे तर एखाद्या कुटुंबीयाच्या अंत्यसंस्कारासारखे दु:खाचे प्रसंग येऊ शकतात. अशावेळी मानवी भूमिका घेऊन न्यायाधीशाने तारतम्य दाखवावयाचे असते.

बीडच्या एका प्रसिद्ध वकिलाच्या भाच्याचा जवळच्याच त्याच्यागावी खून झाला होता. ज्यांच्यावर खूनाचा आरोप होता ती मंडळी सधन आणि दबदबा असलेली होती. जे दोन- तीन सरकारी वकील तेव्हा होते त्या सर्वांनी कधी ना कधी आरोपीचे वकील म्हणून इतर खटल्यात कामे केली होती. त्यामुळे या खटल्यात विशेष सरकारी वकील नेमला जावा अशी फिर्यादीने मागणी केली. मला या खटल्यात विशेष सरकारी वकील नेमले गेले. घडलेली घटना कित्येकवेळा खरी असते; परंतु ती सिद्ध करण्यासाठी असत्याची मदत काही वेळा घेतली जाते. या खटल्यातील एका साक्षीदाराने अतिशय उत्तम जबानी दिली;

पण शेवटी जेव्हा प्रत्यक्ष घटनास्थळ पाहण्यासाठी न्यायाधीशांच्याबरोबर आम्ही सर्व गेलो तेव्हा तो साक्षीदार बसला होता तेथून घडलेल्या घटनेचा तपशील नीट दिसणे अवघड आहे असे मलाही वाटून गेले. सरकारी वकील म्हणून ही केस चालवताना मला बरेच महत्त्वाचे अनुभव आले. तपासणी अमलदारापैकी फक्त त्यावेळी सेवानिवृत्त झालेला एकच अधिकारी प्रामाणिकपणे माझ्याबरोबर होता. इतर पोलिस अधिकारी आरोपींच्या गोतवळ्यातच नेहमी असत व अनेक निरोप पाठवूनही मजकडे येत नसत. या खटल्यात बीडला आरोपींना शिक्षा झाली; पण उच्च न्यायालयाने त्यांचे अपील मंजूर केले.

एखादा गुन्हा एक-दोन माणसेच करतात; परंतु ज्याच्याशी आपले शत्रुत्व आहे अशा सर्वांना किंवा खऱ्या आरोपीच्या नातेवाईकांना गुंतवण्याची प्रवृत्ती असते. यामुळे मूळ घटना खरी असली सर्वांचीच सुटका होण्याचे प्रकार होतात. गेवराईला भर आठवडेबाजारात एक रुपयावरून एका खाटकाने दुसऱ्यावर खांद्यापासून कंबरेपर्यंत तिरपा वार केला व त्याला गंभीर जखमी केले. खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्याबद्दल झालेल्या या खटल्यात त्या एकाच व्यक्तीला आरोपी करण्याऐवजी दहा जणांना गुंतवण्यात आले. या सर्व आरोपींनी हल्ला झालेल्या इसमास चहुबाजूने घट्ट धरले होते व सर्वांच्या हातात शस्त्रे होती असे फिर्यादीत म्हटले होते. असे जर असते तर अनेक जखमा झाल्या असत्या. ज्या प्रकारची जखम आढळली ती समोरून कोणी घट्ट धरून राहिल्यास कशी होऊ शकेल? या खटल्यात सगळ्याच आरोपींना संशयाचा फायदा देऊन सोडून देण्यात आले; त्यात खराही आरोपी होता.

या माझ्या कामगिरीचा एक भलताच अनपेक्षित परिणाम मी अनुभवला. एकदा मी गेवराईच्या बसस्थानकावर बसमध्ये चढत होतो. आत काही भांडण चालू होते. भांडणारा एक इसम मला पाहताच एकदम जोरात आला आणि त्याच्याशी भांडणाराला म्हणाला, 'अब तो डरता नही, तुमको काट डालूंगा. एक को फाड डाला था तो वकीलसाहबाने छुडा दिया. अब भी छुडा देगें.' मला पक्षकाराची ओळख पटली आणि त्याला कसेबसे शांत करून मी अडचणीतून निभावलो.

काळ झपाट्याने बदलला होता. काकांच्या वकिलीच्या काळात असलेले वकील आणि पक्षकार यांच्या संबंधाला असलेले बिगर व्यावसायिक बंध मी वकिलीला आलो त्यावेळीही कायम होते. काहीही घडले तर आपले वकील हा आपला आधार आहे असे पक्षकारांना वाटे. काळ जसा बदलत गेला तसतसे समाजातलेही वकिलांचे स्थानही खालावत गेले. गावातल्या समाजकारणाचे, राजकीय चळवळींचे आणि धार्मिक उत्सवांचे पुढारपण वकिलांकडे राहिले नाही. पूर्वी वकील आपले प्रतिष्ठा जपत तसेही नेहमीच होत नाही. एखादा वकील आपल्याकडे भाडेकरू म्हणून आहे याचा घरमालकाला अभिमान वाटे. आता वकिलाला भाड्याने जागा मिळणे अवघड झाले आहे.

न्यायव्यवस्थेचा समाजात मोठा दरारा होता. अगदी क्रिमिनल प्रोसिजर कोडाच्या१०७ व्या कलमाच्या गुन्हा करू नये म्हणून दोन्ही पक्षाकडून जामीन घेण्याच्या प्रतिबंधक कारवाईलासुद्धा लोक घाबरत. कोर्टात आरोपी म्हणून उभे राहावे लागावे ही नामुष्कीची गोष्ट आहे असे लोकांना वाटे. पोलिसांचा वचक कमी झाला. त्यांच्याबद्दलचा विश्वासही कमी होत गेला. सर्वत्र दांडगाईचे व दादागिरीचे वर्चस्व वाढले व जीवनाचे नियमन करणाऱ्या सर्व संस्थांना आपल्या अंकित करण्याचा प्रयत्न सुरू झाला.अन्वरबेग नावाचा बीड जवळच्याच एका गावाचा पोलिस पाटील मला आठवतो. माझ्या विद्यार्थीदशेच्या काळात काकांचे पक्षकार म्हणून ते घरी येत तेव्हापासून मी त्यांना पाहत होतो. अंगकाठीने किरकोळ असले तरी उंचेपुरे असलेले अन्वरबेग रुबाबदार दिसत. आजूबाजूच्या गावातही त्यांच्याबद्दल आदर होता. पोलिस पाटील या पदाचा पोलिसही तेव्हा मान ठेवीत. नंतरच्या काळात गावात भलतीच माणसे बलवान होऊ लागली. अन्वरबेगांच्या एका नातीला तिच्या नवऱ्याने सिगारेटचे चटके दिले. तिला घेऊन बीडला आलेल्या अन्वरबेगांचा दीनवाणा चेहरा मला अजून आठवतो. असहायतेची त्यांच्या चेहऱ्यावरची भावना सर्वसामान्य सरळमार्गी माणसाच्या झालेल्या अवस्थेचेच प्रतिनिधीत्व करीत होती.

व़किली सुरू करून पंधरा वर्षे होऊन गेली होती. स्थिर झालेल्या आयुष्यक्रमात बदल करण्याची इच्छा व्हावी अशा काही घटना घडत गेल्या. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि नव्याने स्थापन झालेला जनता पक्ष सत्तेवर आला. या निवडणुकीत विरोधी पक्षांना चांगले यश मिळेल असे दिसत होतेच; पण मिळालेले यश सर्व अपेक्षापेक्षा जास्त होते. लोकसभेची निवडणूक

मी लढवावी अशी आलेली सूचना मी नाकारली होती. वकिलीवर आपले केंद्रित असलेले लक्ष विचलित होऊन त्यात खंड पडू नये ही ही इच्छा त्यामागे होती. मिळालेल्या सत्तेत एक भागीदार मी ज्यात काम करीत होतो तो समाजवादी पक्षही होता. तो आता सत्ताधारी पक्षाचा एक घटक झाला होता. विरोधी पक्षाचे सभा, निदर्शने, मोर्चे, निवेदने असले काम माझ्या अंगवळणी पडलेले व स्वभावाशी जुळणारे होते. सत्ताधारी पक्षाचे काम अपरिचित व मला अवघड होते. जे आजवर आमच्याजवळ फिरकलेही नव्हते अशा लोकांनी नव्या पक्षात गर्दी केली. सत्तेचे कोणते लाभ मिळू शकतात याचा त्यांना झटपट अंदाज येत होता. विविध पदे व मुंबईच्या मंत्रालयातील कामे यासाठी शिफारसी करणे मला जमू शकणार नव्हते. सत्ताधारी पक्ष म्हणून कसे वागावे याचा माझ्या ज्येष्ठ मित्रांनाही अंदाज येत नव्हता. आपण पक्षीय राजकारणातून आता निवृत्त व्हावे व वकिलीवर पूर्ण लक्ष द्यावे असा विचार तर मी केलाच, शिवाय उच्च न्यायालयात वकिली करावी असाही विचार मी करू लागलो.

या विचाराला पूरक असे आणखी एक कारण त्याच सुमारास घडले. तेथे बदलून आलेल्या एक-दोन जणांनी वातावरण दूषित केले. न्यायाचा निवाडा न्यायालयात होण्याऐवजी बाहेरच करण्याचा प्रकार सुरु झाला. संस्थेचे पावित्र्य व विश्वासार्हता यालाच धक्का पोहचू लागला. एक दोन कोर्टात तर जाणेच चांगल्या वकिलांनी बंद केले. पूर्वी कोणत्याही अपप्रवृत्ती वकील संघातील सत्शक्ती एकवटून विरोध करीत. त्यांचीच ताकद कमी होत असल्याचे दिसू लागले. या वातावरणाचाही परिणाम माझा मुंबईला जाण्याचा बेत दृढ होण्यात झाला.

एके दिवशी मी माझ्या एका ज्येष्ठ स्नेह्यांना मुंबईला जाण्याचा माझा विचार सांगितला व त्यांचे मत विचारले. त्यांनी लगेच अनुकूल मत तर दिलेच; शिवाय सुधाकर देशमुख हा माझा मित्रही असाच विचार करतो आहे व तो मुंबईला येतो आहे ही ही बातमी दिली. आठ दिवसांतच मी मुंबईला जाण्याचा बेत पक्का केला. बीडच्या वकिलांनी आपल्या गावाहून मुंबईस जाणाऱ्या आम्हा दोघांना सक्रिय पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. मी कोणाला काम मागितले नाही. पण सासरी जाणाऱ्या मुलीला नातेवाईकांनी निरोपादाखल खण द्यावेत तसे दहा- बारा वकीलपत्रे बीडकरांनी जातानाच माझ्या जवळ दिली. माझ्या आयुष्यात मोठे परिवर्तन होत होते. १९६२ साली मी वकील झालो तेव्हाच 'नरेन्द्रला मुंबईला पाठवा' असे माझ्या वडलांना त्यांचे स्नेही व मुंबईचे ज्येष्ठ वकील व्यंकटराव देशपांडे यांनी माझे अभिनंदन करणाऱ्या पत्रात लिहिले होते. पण त्यावेळी माझ्या डोक्यात राजकारण होत; म्हणून मी तेव्हा मुंबईस गेलो नव्हतो. आता उशिरा का होईना तो निर्णय मी घेतला होता.

वडलांना जेव्हा मी माझा विचार सांगितला आणि त्यांचे मत विचारले तेव्हा ते एवढेच म्हणाले, ''डबके सोडून समुद्रात पोहण्याची इच्छा होणे ही केव्हाही चांगलीच गोष्ट आहे.''